| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २०१ वा | रविवार दिनांक १९ ऑक्टोबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### चौदा वर्षाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार

भुम/प्रतिनिधी- :पोलीस ठाणे अंतर्गत एका गावातील १४ वर्ष ८ महिन्याची मुलगी दि.१७.१०.२०२५ रोजी हि व तिची आई घरी असताना एका गावातील पाच तरुणाने गैरकायद्याची मंडळी जमवून तिचे आईस शिवीगाळ करुन घराला बाहेरुन कडी लावून नमुद तरुणामधील एका तरुणाने नमुद मुलीस शेतात नेवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. इतर तरुणांनी शिवीगाळ करुन तु झालेल्या प्रकाराची कोठे वाच्यता केल्यास तुला व तुझ्या आईला जिवे ठार मारीन अशी धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतेचे आईने दि.१७.१०.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या. सं.कलम-६४(१), १२५, १८९(२), १९१(२), १९३(३), १९०, ३५२, ३५१(३) सह पोक्सो अधिनियम ४, ८, १२ सह ९२ (ड) अपंग व्यक्ती अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### रुग्णाच्या खिशातील पन्नासहजाराची चोरी

उमरगा/प्रतिनिधी- उमरगा पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी भिमराव शामराव चव्हाण, वय ६५ वर्षे, रा.जळकोटवाडी ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि. १४.०९.२०२५ रोजी उमरगा येथील बेडदुर्गे हॉस्पीटल येथे आय सी. यु वार्डात उपचार घेत असताना फिर्यादी यांनी टेबलवर ठेवलेल्या पॅन्टच्या खिशातील ५०,००० रोख रक्कम ही राणी रा. येणेगुर ता. उमरगा जि. धाराशिव यांनी चोरुन नेले.

अशा मजकुराच्या फिर्यादी भिमराव चव्हाण यांनी दि.१७.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०५(ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

### कुंथलगिरी जैन मंदिरात चोरी

वाशी/प्रतिनिधी- पोलीस ठाणे अंतर्गत दि. १६.१०.२०२५ रोजी १९.३० ते दि. १७.१०.२०२५ रोजी कुंथलगिरी जैन मंदीर येथील मेन गेटचे दरवाज्याचे कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने तोडून आत प्रवेश करुन दान पेटीतील ९,००,००० ते १२,००,००० रोख रक्कम व देव देवतांच्या पितळी मुर्त्या असा एकुण ९,००,००० ते १२,१०,५०० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी उमंग रविंद्र शहा, वय ४५ वर्षे, रा. कुंथलगिरी ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.१७. १०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४), ३०५(डी) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पंचाहत्तरीनिमित्त एसटीचा अनोखा उपक्रम!

## ७५ बसस्थानकांवर मोफत वाचन कट्टा – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक



मुंबई /प्रतिनिधी- : भारताचे लोकप्रिय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या पंचाहत्तरीनिमित्त महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एक आगळावेगळा, लोकाभिमुख आणि संस्कारमूल्ये जपणारा उपक्रम हाती घेतला आहे. राज्यातील प्रमुख ७५ एसटी बसस्थानकांवर मोफत वाचनालय उभारून ज्ञान, साहित्य आणि संस्कृतीचा दिवा जनतेसाठी प्रज्वलित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

एसटी महामंडळाच्या मुख्यालयात झालेल्या ३०९ व्या संचालक मंडळाच्या बैठकीत या निर्णयाची घोषणा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली. या बैठकीस परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, तसेच उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर उपस्थित होते.



मंत्री सरनाईक म्हणाले, विद्यमान खासदार श्रीकांत शिंदे आणि ज्येष्ठ नेते विनय सहस्रबुद्धे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम आकाराला आला आहे. मोदीजींच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून सर्वसामान्य नागरिकांसाठी 'मोफत खुले वाचनालय' उभारण्यात येणार आहे.

या वाचनालयांमध्ये वि.स. खांडेकर, कुसुमाग्रज, पु.ल. देशपांडे, नामदेव ढसाळ, व.पु. काळे, विश्वास पाटील अशा नामवंत साहित्यिकांच्या कृती उपलब्ध असतील. तसेच एमपीएससी व यूपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मौल्यवान संदर्भग्रंथ ठेवण्यात येणार आहेत.

हा 'वाचन कट्टा' मराठी भाषेचा समृद्ध वारसा जपणारा ठरेल आणि समाजात वाचन संस्कृतीचा नवा सुवर्णप्रकाश पसरवेल, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले.

> **मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून देणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंचाहत्तरी निमित्त आम्ही जनतेसाठी ज्ञानाची ही 'अनमोल भेट' देत आहोत. वाचन संस्कृती आणि मराठी साहित्याचा प्रचार हा आमचा लोकाभिमुख उपक्रम आहे.**
> **– प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री**

## प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून बांधून ठेवणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- परंडा पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, रिहान रियाज कुरेशी, मतीन ख्वॉजाकुरेशी दोघे रा. माणकेश्वर ता. भुम जि. धाराशिव यांनी दि.१७.१०.२०२५ रोजी माणकेश्वर येथे स्वत:चे घराचे पाठीमागे गोवंशीय जनावरांची कत्तल करुन २३० किलो गोवंशीय मांस अंदाजे ७५,२०० किंमतीचे जवळ बाळगलेले असताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द कलम ५ (क),९, ९(अ) प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

तसेच दुसऱ्या घटनेत धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत –समिर मिया शेख, वय ३७ वर्षे, रा.सांजा वेस गल्ली धाराशिव ता. धाराशिव, खुर्शीद पाशा शेख, रा. खिरणीमळा धाराशिव अनोळखी इसम दोन यांनी दि.१७.१०.२०२५ रोजी खुर्शीद पाशा शेख रा. खिरणीमळा धाराशिव यांचे पत्र्याचे शेड येथे गोवंशीय मांस व लहान मोठे १७ जनावरे कत्तलीसाठी ठेवलेले, आयशर टेंम्पो व लोखंडी सुरी सत्तुर असा एकुण ११,४१,००० किंमतीचे गोवंशीय जातीचे लहान व मोठे गायी वासरे हे बांधुन त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या बांधुन वाहतुक करत असताना धाराशिव शहर पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१) (बी) सह प्राणी संरक्षण अधिनियम ५(अ), ५(क), ५(ड), ९, ९(अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## अवैध मद्य विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)–पोलीस ठाणे अंतर्गत पोलीसाकडून समजलेली माहिती अशी की, भिमाया दस्तया गुत्तेदार, वय ४० वर्षे, रा. तलमोड ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.१६.१०.२०२५ रोजी तलमोड येथे अंदाजे १,००० किंमतीची १० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. व्यंकट ज्योतीबा जगदाळे, वय ५० वर्षे, रा. जगदाळवाडी ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.१६.१०.२०२५ रोजी १५.०० वा. सु जगदाळवाडी येथे अंदाजे २,००० किंमतीची २० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम–६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## संस्कार सर्वात महत्त्वाचे!

पैसापेक्षा मुलावर संस्कार महत्त्वाचे असतात ते पालकास कळत नाहीत. सध्याला मुले सांभाळत नसल्याने पुण्यातील २२४ ज्येष्ठ नागरिकांनी पोटगीसाठी प्रशासनाचे दार ठोठावले आहे. मागील २ वर्षांत पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरातील ज्येष्ठ नागरिकांनी त्यांची मुले त्यांचा सांभाळ करत नसल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे केल्या आहेत. अपत्याच्या जन्मापासून निर्माण झालेली या नात्यातील भावनिक वीण दिवसेंदिवस कमकुवत होत असल्याच्या घटना १५ कोटींहून अधिक वृद्ध असलेल्या भारतात सहस्रोंवरून लाखोंपर्यंत पोचल्या असतीलच. काही घटना समोर आल्या असतील, काही आसवांमध्ये सुकून गेल्या असतीलही ! संपत्तीसाठी वृद्धांचा छळ, वृद्धाश्रमात दिवाळी साजरी करणारे वृद्ध पालक, संपत्ती मिळाल्यानंतर वृद्ध मात्या-पित्यांना वार्यावर सोडणे असे एक ना अनेक घटनांचे मथळे नियमितच्या वाचनातील आहेत. मुलांनी सोडलेल्या वृद्ध पालकांच्या होत असलेल्या वाताहतीचे चित्रपट, नाटके पाहिल्यानंतर आणि बातम्या वाचल्यानंतर व्यक्त होणारी हळहळ तात्पुरतीच ठरते. सामाजिक दायित्व म्हणून प्रशासन ज्येष्ठ नागरिकांना पोटगी मिळवून देण्याचा प्रयत्नही करील; पण वृद्ध पालक आणि त्यांची तरुण मुले यांच्यात निर्माण झालेली दरी पोटगीने भरून निघेल का? भारतियांनी मनोवेगाने स्वीकारलेल्या पाश्चात्त्य विकृतीचा हा परिपाक भारतियांना एकमेकांपासून तोडत आला आहे. भारतीय संस्कृतीचा पाया, म्हणजे संस्कार आणि त्या संस्कारांचा केंद्रबिंदू म्हणजे ईश्वर भक्ती. 'मातृदेवो भव । पितृदेवो भव ।', ही ओळ ईश्वर कुणात आहे? हे सांगते. ही शिकवण भारतीय समाजाच्या भावनात्मक आणि नैतिक जीवनाची दिशा ठरवणारी आहे. 'आई-वडिलांना देवतासमान मानावे', या हिंदु संस्कृतीच्या शिकवणीमागे असलेला मानसशास्त्रीय अर्थ समजून घेतला, तर भारताच्या समस्यांच्या सूचीतून वृद्धांची समस्या कायमची बाहेर पडेल. श्री गणेश, श्रीराम, श्रावणबाळ, भक्त पुंडलिक अशी मातृ-पितृभक्तांची उदाहरणे असलेल्या भारतीय संस्कृतीत मुले सांभाळ करत नाहीत; म्हणून पोटगी मागण्याची वेळ माता-पित्यांवर यावी, याहून दुर्दैवी काय असू शकते ? एकेकाळी एखाद्याला पाणी देणे, हेही पुण्यकर्म मानले जायचे. आजच्या काळात तीच कर्तव्यभावना दुर्मिळ झाली आहे. वृद्ध पालकांना सांभाळण्याविषयी सध्याच्या मुलांची असलेली मानसिकता ही आधुनिकीकरणाच्या धडपडीत संस्कारांची परंपरा विस्मृतीत गेल्याचे दर्शक आहे. १९-२० व्या शतकात इंग्रजी शिक्षण, औद्योगिक क्रांती आणि पाश्चात्त्य विचारसरणी भारतात आली. त्यानंतरच 'कर्तव्य' हा केंद्रबिंदू असलेली भारतीय संस्कृती 'व्यक्तीवाद' या पाश्चात्त्य विकृतीमुळे लयास जाऊ लागली आणि त्यामुळेच भारतीय समाजाचे नैतिक संतुलन ढासळत गेले. व्यक्तीवादावर आधारित विचारसरणीमुळे शिक्षणाने रोजगार तर दिला; पण संस्कारांची पाटी कोरीच ठेवली. आतातर तंत्रज्ञानाच्या युगात पालक वृद्ध झाले की, त्यांना वृद्धाश्रमात ठेवणे, ही 'नवी सामान्य' (न्यू नॉर्मल) गोष्ट झाली आहे. वेगाने पालटणार्या आजच्या कालपद्धतींनुसार ज्येष्ठ नागरिकही स्वतःच्या अधिकारांविषयी जागरूक आहेत. कायद्याचाही त्यांना पाठिंबा आहे. पोटगी मिळेलही; पण समाजातून बेपत्ता झालेली आपुलकी, घरोबा, स्नेह, बांधीलकी कोण आणि कुठे शोधणार? तिन्ही सांजेला म्हटली जाणारी स्तोत्रे, श्लोक शिकवण्यांमुळे होईनाशी झाली, तसे ज्येष्ठांना रिकामेपणा आला. आता उठल्यावर भूमीवंदन नाही, स्नानानंतर वडीलधार्यांना वाकून नमस्कार नाही, त्यानंतर पाठीवर मिळणारी आशीर्वादाची थाप आणि अनुभवाचे शब्दही नाहीत. त्यामुळे आता जीवनात 'राम'ही राहिलेला दिसत नाही, आहे तो केवळ 'मोबाईल' ! तंत्रज्ञानाच्या युगात अग्रभागी असलेली कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) बोट दाबल्यावर घडाघडा माहिती देत असल्याने वाडवडिलांचे अनुभव जुन्या गोधडीप्रमाणे गुंडाळून माळ्यावर पडले आहेत. 'एआय' माहिती देईल, मनोरंजन करील; पण नुकतेच जन्मलेले तंत्रज्ञान ७०-८० वर्षांच्या प्रायोगिक, तरीही मायेच्या अनुभवापुढे सपशेल फोल आहे, याची जाण कुणाला राहिली आहे का ? याचा शोध घ्यावा लागेल. धर्मशिक्षण हा समाजाच्या नैतिक रचनेचा गाभा आहे. ते बंद झाले की, समाज स्वार्थी आणि निर्जीव होतो. पुण्यातील ज्येष्ठ नागरिकांनी केलेल्या तक्रारी त्याच स्वार्थीपणाचे आणि निर्जिवतेचे लक्षण! हिंदूंना हिंदु धर्माचे शिक्षण न मिळाल्याने काय गत होते? त्याचे हे चित्र आहे. धर्माचे शिक्षण म्हणजे केवळ धार्मिक ग्रंथ वाचन नव्हे, तर धर्माधिष्ठित मूल्य आत्मसात् करणे. जेव्हा धर्माचे शिक्षण मिळते, तेव्हा माणूस 'हक्क' नाही, तर स्वतःची 'कर्तव्ये' पाहू लागतो आणि हाच भाव समाजाला पुन्हा नैतिकतेकडे नेऊ शकतो. भारतीय समाजातील कुटुंबसंस्था शतकानुशतके सशक्त राहिली; कारण तिचा पाया होता एकत्र कुटुंबपद्धत; पण मागील २ दशकांत हे चित्र झपाट्याने पालटले. भौतिकवादी जीवनशैलीने 'एकत्र कुटुंब' 'एकल' झाले. यामुळे वृद्धांच्या आयुष्याला भावनिक, सामाजिक आणि आध्यात्मिक पातळीवर पुष्कळ मोठी झळ बसली. संस्कार देणारी पिढी अव्यक्त झाली. भारताचा आत्मा 'संस्कार' आहे. धर्म याच संस्कारांचे पोषण करतो. मुलांना बालपणीपासूनच धर्मग्रंथातील ज्ञान आत्मसात् करायला शिकवले गेले, तर ते पालकांचा अनादर करूच शकणार नाहीत. आजची पिढी या धर्मशास्त्रांपासून पूर्णतः दुरावली आहे. परिणामी पालकांविषयीचा आदर 'कर्तव्य' न रहाता 'पर्याय' झाला आहे. एकेकाळी देवापूर्वी पालकांना 'नमस्कार' आता 'पालकदिना'च्या 'स्टेटस' पुरते मर्यादित राहिले आहे. प्रसारमाध्यमे आणि चित्रपट यांच्या माध्यमातून कार्य करणार्या साम्यवाद्यांनी वृद्धांचे चित्रण 'नव्या पिढीला पुढे जाण्यापासून रोखणारे लोक', अशा पद्धतीने केले. ज्या माध्यमांनी 'वृद्धांची सेवा' ही अभिमानाची गोष्ट म्हणून दाखवायला हवी होती; त्यांनी केलेल्या चुकीच्या चित्रणामुळे 'मर्यादाहीन व्यक्तीस्वातंत्र्य, बंधनातून मुक्तता' ही मानसिकता बळावली. स्वातंत्र्य म्हणजे पालकांपासून दूर करणे नव्हे, तर त्यांच्याप्रतीचे उत्तरदायित्व ही शिकवण केवळ हिंदु धर्मच देतो.त्यामुळे पाल्यास संस्कार महत्त्वाचे आहेत हे लक्षात ठेवले आहेत.

# लिव्हर सडल्यावर शरीर ओरडून ओरडून देतं हे १० इशारे





शरीरात काही अवयव असे असतात जे सतत कार्यरत राहतात, थांबतच नाहीत. त्यांच्यामुळेच आपण जगतो, खातो, विचार करतो, हालचाल करतो. त्यापैकी सर्वात निःशब्द पण अत्यंत महत्त्वाचा अवयव म्हणजे यकृत अर्थात लिव्हर. हे आपल्या शरीराचं ङ्गनैसर्गिक फिल्टरफ आहे, जे विषारी द्रव्यं बाहेर टाकतं, रक्त शुद्ध करतं आणि पचनक्रियेला सक्षम ठेवतं. पण जेव्हा हेच यकृत हळूहळू कमजोर होऊ लागतं, तेव्हा शरीर अनेक प्रकारे त्रास देऊ लागतं. कधी थकवा, कधी भूक कमी होणं, कधी त्वचा पिवळी पडणं. सगळ्यात धोकादायक गोष्ट म्हणजे लिव्हर डॅमेज हळूहळू होतं आणि बऱ्याच वेळा आपल्याला त्याची कल्पनाही नसते. सुरुवातीची लक्षणं अगदी किरकोळ वाटतात, पण वेळेवर लक्ष न दिल्यास ही स्थिती जीवघेणी ठरू शकते. त्यामुळे लिव्हरच्या आरोग्याबद्दल जागरूक राहणं ही जबाबदारी प्रत्येकाची आहे. जर तुम्हाला पुरेशी झोप घेऊनही दिवसभर थकवा जाणवत असेल, तर ते केवळ कामाचा ताण नसून लिव्हरच्या कमजोरीचं संकेत असू शकतं. यकृत नीट काम न केल्यास शरीरात विषारी द्रव्यं साचतात, ज्यामुळे ऊर्जा कमी तयार होते. परिणामी अंगात आळस, दुर्बलता आणि थकवा जाणवतो. ही अवस्था कायम राहत असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घेणं आवश्यक आहे.

**त्वचा आणि डोळे पिवळे पडणे, अंगावर खाज येणे**

काविळ म्हणजेच जॉन्डिस हा लिव्हरच्या आजाराचा पहिला स्पष्ट संकेत असतो. यकृत बिलीरुबिन नावाचं पिवळं द्रव्य प्रक्रिया करू शकत नाही, त्यामुळे त्वचा आणि डोळ्यांचा रंग बदलतो. काही वेळा हात, पाय आणि पोटावर तीव्र खाज येऊ शकते. हे शरीरातील पित्त त्वचेखाली साचल्याने होतं. या अवस्थेकडे दुर्लक्ष केल्यास यकृताचे नुकसान वाढत जाते.

**भूक कमी होणे आणि वजन झपाट्याने घटणे**

जेव्हा यकृत नीट कार्य करत नाही, तेव्हा पचन आणि मेटाबॉलिझम दोन्हीवर परिणाम होतो. थोडं अन्न खाल्लं तरी पोट भरल्यासारखं वाटतं, भूक लागत नाही किंवा उलट्या सारखं वाटतं. अशा वेळी वजन झपाट्याने कमी होऊ लागतं. हा बदल ङ्गडाएटफ्चा परिणाम नसून शरीरातील गंभीर असंतुलनाचं लक्षण असू शकतो.

**पोटाच्या उजव्या बाजूला वेदना किंवा सूज येणे**

लिव्हर हा पोटाच्या उजव्या वरच्या भागात असतो. जर तिथे सतत जडपणा, दुखणं किंवा दाब जाणवत असेल, तर ते यकृताच्या सूजेचं संकेत असू शकतं. गंभीर अवस्थेत पोटात पाणी साचू शकतं, ज्याला ङ्गअॅसाइटिसफ म्हटलं जातं. त्यामुळे पोट फुगतं आणि हालचालींमध्ये अडचण येते.

**लघवी आणि मलाच्या रंगात बदल दिसणे**

जर लघवी गडद पिवळसर किंवा तपकिरी झाली असेल, आणि मल फिकट किंवा पांढरट दिसत असेल, तर हे लिव्हरच्या बिघाडाचं लक्षण असतं. अशावेळी बिलीरुबिनचं प्रमाण वाढलेलं असतं, आणि पित्ताचं वहन अडकलं असतं. ही अवस्था लिव्हरच्या कार्यक्षमतेबद्दल स्पष्ट संकेत देते.

**सहज जखमा होणे किंवा पाय-टाचांमध्ये सूज येणे**

यकृत रक्त गोठवणारे प्रोटीन तयार करतं. ते नीट तयार न झाल्यास छोट्या जखमेवरही रक्त थांबत नाही, शरीरावर निळे डाग पडतात. लिव्हरच्या आजारात ङ्गअल्ब्युमिनफ नावाचं प्रोटीन कमी होतं, ज्यामुळे शरीरातील द्रव रक्तवाहिन्यांबाहेर साचतो आणि पाय-टाच सुजतात. हे ङ्गएडीमाफ म्हणून ओळखलं जातं आणि दुर्लक्ष केल्यास ते वाढू शकतं.

**लिव्हर स्वच्छ ठेवण्याचे सोपे उपाय**

एम्समधील लिव्हर तज्ज्ञ डॉक्टर सौरभ सेठी यांच्या मते, लिव्हरला डिटॉक्स करण्यासाठी काही नैसर्गिक पेय अत्यंत उपयुक्त ठरतात. ग्रीन टीतील अँटिऑक्सिडंट्स लिव्हरच्या पेशींचं संरक्षण करतात. कॉफीतील कॅफीन आणि पॉलीफेनॉल्स लिव्हरला सक्रिय ठेवतात आणि फॅट जमा होण्यापासून रोखतात.

बीटरूट रस रक्त शुद्ध करतो आणि यकृतातील विषारी द्रव्यं बाहेर टाकतो. हे पेय रोजच्या जीवनशैलीत समाविष्ट केल्यास लिव्हरचं आरोग्य टिकून राहतं आणि शरीर अधिक सक्षम बनतं.

# सकाळी जोर लावूनही पोट साफ होत नाही?





आजच्या घाईगडबडीच्या जीवनशैलीत सगळं काही झपाट्यानं होतं, पण पचन मात्र सगळ्यात मागे राहतं. सकाळी उठल्यावर पोट स्वच्छ न होणं, दिवसभर पोट जड वाटणं आणि आळस! हे सगळं आजकाल तरुणांनाही भेडसावतं. चुकीचं खाणं, पुरेसं पाणी न पिणं, झोपेचा अभाव आणि व्यायामाचा अभाव यामुळे आतड्यांची हालचाल मंदावते. काही जण लगेच औषधं घेतात, पण ती तात्पुरती मदत करतात. शरीराला खरं शुद्ध करणारा आणि पचन सुधारवणारा उपाय म्हणजे नैसर्गिक डिटॉक्स ड्रिंक. हा पेय प्रकार केवळ पोट साफ करत नाही तर आतड्यांचं आरोग्य, त्वचा आणि एकूण ऊर्जा सुधारण्यातही मदत करतो. झोपण्यापूर्वी घेतलेलं हे साधं पेय सकाळपर्यंत तुमच्या शरीरात मोठा बदल घडवू शकतं. भारतीय आहारात तुपाला नेहमीच औषधी मानलं गेलं आहे. यात ब्युटरेट नावाचं फॅटी ॲसिड असतं, जे आतड्यांच्या भिंती मजबूत करतं आणि पचनक्रिया सुरळीत ठेवतं. रात्री झोपण्यापूर्वी थोडं तूप घेतल्यास आतड्यांतील सूक्ष्म जंतूंचं संतुलन राखलं जातं. त्यामुळे सकाळी पोट स्वच्छ होण्यास मदत होते. शरीरातील दाह कमी करण्याचं आणि चांगले बॅक्टेरिया वाढवण्याचं कामही तूप करते.

**इसबगोल**

इसबगोल म्हणजे शरीराचं स्वच्छतादूत. यात असलेलं विद्रव्य फायबर पाणी शोषून मल मऊ करतं आणि आतड्यांमधून मल सहज बाहेर पडतो. दररोज झोपण्यापूर्वी कोमट पाण्यात एक चमचा इसबगोल मिक्स करून प्यायल्यास काही दिवसांतच फरक जाणवतो. इसबगोल घेतल्यानंतर पुरेसं पाणी पिणं अत्यावश्यक आहे, अन्यथा उलट पोट जड वाटू शकतं. हा उपाय नैसर्गिक असल्याने शरीरावर कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत.

**सैंधव मीठ**

सामान्य मीठाऐवजी सैंधव मीठ वापरणं शरीरासाठी अधिक आरोग्यदायी असतं. यात असलेले खनिज घटक आतड्यांना सक्रिय करतात आणि गॅस, ॲसिडिटी तसेच पोटातील जळजळ कमी करतात. कोमट पाण्यात चिमूटभर सैंधव मीठ मिसळल्याने पचनप्रक्रिया नैसर्गिकरीत्या सुधारते. हे मीठ शरीरातील इलेक्ट्रोलाइट्स संतुलित ठेवून डिटॉक्स प्रक्रियेला चालना देतं.

**झोपण्यापूर्वीच योग्य वेळ**

पचनक्रिया रात्री अधिक प्रभावीपणे काम करते. म्हणूनच झोपण्याच्या सुमारे तासभर आधी हे डिटॉक्स पेय घेतल्यास सकाळी पोट पूर्णपणे रिकामं होतं. ज्यांना वजन कमी करायचं आहे त्यांनी हे पेय रात्रीच्या जेवणापूर्वी अर्धा तास आधी घेणं फायदेशीर ठरतं. शरीरातील विषारी घटक बाहेर पडल्याने चयापचय वेगवान होतं आणि ऊर्जाही वाढते.

**संपूर्ण डिटॉक्सचा लाभ**

नियमितपणे हा उपाय केल्यास पचनक्रिया सुधारते, चयापचय जलद होतं आणि शरीरातील टॉक्सिन्स बाहेर टाकले जातात. त्यामुळे केवळ पोट नव्हे तर त्वचा, मेंदू आणि ऊर्जा या सर्व गोष्टींवर सकारात्मक परिणाम होतो. ताण कमी होतो, झोप सुधारते आणि सकाळी उठल्यावर हलकं, ताजं वाटतं. हा उपाय रोज केल्याने औषधांशिवाय पोटाची

# रात्री झोपण्याआधी प्या हे खास पाणी, एका क्षणात लागेल गाढ व शांत झोप

काही लोकांना दिवसभर थकल्यानंतरही रात्री शांत गाढ झोप लागत नाही. अशावेळी या लोकांनी झोपण्याआधी या खास प्रकारचं दूध किंवा पाणी प्यावं. यामुळे एनर्जीही वाढेल व शांत झोपही लागेल. दिवसभराच्या धावपळीत आणि मानसिक ताणामुळे अनेकदा रात्री झोप येत नाही. आपण बेडवर झोपून कुस बदलतो, पण मन शांत होत नाही आणि शरीर थकलेले वाटते. अशा वेळी दुसऱ्या दिवशीही थकवा, आळस आणि तणाव जाणवतो. झोपेचा अभाव फक्त शरीरावरच नाही, तर मूडवरही परिणाम करतो. मात्र, नैसर्गिक आणि हेल्दी पेय घेऊन तुम्ही झोप सुधारू शकता.

काही पेये शरीराला पोषण देतात, स्नायूंवर ताण कमी करतात आणि मेंदूला शांत करतात. रात्रीच्या वेळी घेतल्यास उर्जाही मिळते आणि दिवसभरची थकवा कमी होतो. चला पाहूया कोणती नैसर्गिक ड्रिंक्स तुम्हाला शांत झोप मिळवून देऊ शकतात.

गरम दूध हे आई-आजींच्या काळापासूनचे झोपेचे रामबाण उपाय आहे. त्यामध्ये असलेले ट्रिप्टोफॅन आणि मेलाटोनिन मेंदूला शांत करतात आणि झोपेची गुणवत्ता सुधारतात. झोपण्यापूर्वी १०१५ मिनिटे गरम दूध पिणे शरीराला नैसर्गिक शांती देते. यामुळे स्नायूंवरील ताण कमी होतो आणि मेंदू आरामात झोपेची तयारी करतो. जर दूधामध्ये थोडा मध मिसळला तर त्याचा प्रभाव अजून वाढतो, कारण मध मेंदूतील झोपेचे हार्मोन्स उत्तेजित करतो.

**अश्वगंधा दूध –** अश्वगंधा दूध रात्री प्यायल्यास शरीर आणि मन दोन्ही शांत होतात. हे दूध कॉर्टिसोल हार्मोन्स नियंत्रित करते, जे तणाव आणि चिंतेमुळे निर्माण होतात. यामुळे मन शांत होते आणि झोप गाढ लागते. झोपण्यापूर्वी साधारण ३० मिनिटे आधी प्यायल्यास परिणाम अधिक स्पष्ट दिसतो. अश्वगंधा दूध नियमित पिण्यामुळे झोपेची वेळ स्थिर होते आणि शरीरातील थकवा कमी होतो.

केळीची स्मूदी-केळ्यामध्ये नैसर्गिक मॅग्नेशियम आणि पोटॅशियमचे घटक असतात, जे स्नायूंवरील ताण कमी करतात. रात्री झोपण्यापूर्वी केळीची स्मूदी प्यायल्यास मेंदू आणि शरीर दोन्ही आरामात जातात. स्मूदीमध्ये थोडे दूध किंवा दही मिसळल्यास प्रभाव अजून वाढतो. हे पेय शरीराला पोषण देते आणि रात्री शांत झोप मिळवून देते. नियमितपणे स्मूदी घेतल्यास दिवसभर उर्जा टिकते आणि थकवा कमी होतो.

**हळद दूध**

हळदीमध्ये असलेले अँटीइन्फ्लेमेटरी गुणधर्म शरीरातील दाह कमी करतात आणि झोपेच्या वेळी नैसर्गिक आराम देतात. हळद दूध प्यायल्यास रोगप्रतिकार शक्ती सुधारते आणि स्नायूंमध्ये ताण कमी होतो. रात्री झोपण्यापूर्वी एक कप हळद दूध प्यायल्यास शरीर आणि मेंदू दोन्ही शांत होतात. हळद दूध नियमित पिण्यामुळे शरीरातील विषारी घटक बाहेर निघतात आणि झोप गाढ लागते.

# व्हिटॅमिन बी १२ कमी असेल तर शरीर बनेल सांगाडा





शाकाहारी लोकांमध्ये व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता सामान्य आहे, परंतु योग्य आहार आणि सप्लीमेंट्सने ती सहजपणे दूर करता येते. जर तुम्हाला निरोगी राहायचे असेल तर तुमच्या आहारात दूध, चीज, दही आणि फोर्टिफाइड पदार्थांचा समावेश करा.

आपलं शरीर रोज मेहनत करतं. चालणं, विचार करणं, काम करणं, सगळं याच्यावर अवलंबून असतं. पण जेव्हा शरीराला पोषणाचा तोल बिघडतो, तेव्हा थकवा, चक्कर येणं, हात-पाय झोंबणं अशा छोट्या वाटणाऱ्या गोष्टी हळूहळू गंभीर रूप घेतात. विशेषत: जेव्हा कारण असतं व्हिटॅमिन इ१२ ची कमतरता. आयर्न, कॅल्शियम, प्रोटीन यांचं नाव आपण नेहमी ऐकतो, पणबी १२ चा उल्लेख क्वचितच होतो. हे व्हिटॅमिन शरीर स्वतः तयार करू शकत नाही, आणि म्हणूनच आहारातून किंवा सप्लिमेंट्समधून ते मिळवणं आवश्यक असतं.

बी १२आपल्या नर्व्ह सिस्टमचं रक्षण करतं, मेंदूला सक्रिय ठेवतं आणि रक्तातील लाल पेशींचं उत्पादन योग्य राखतं. पण सगळ्यात मोठी समस्या म्हणजे हे पोषक घटक मुख्यत्वे मांसाहारी पदार्थांमधून मिळतात, त्यामुळे शाकाहारी आणि व्हेगन लोकांमध्ये याची कमतरता मोठ्या प्रमाणात आढळते. चला तर जाणून घेऊया, कोणते अन्नघटक व्हिटॅमिन बी १२ ची ही उणीव भरून काढू शकतात.

**व्हिटॅमिन बी १२ कमी झाल्याची लक्षणे**

जर तुमच्यात व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता असेल तर हळूहळू अनेक लक्षणे दिसून येतात. बऱ्याचदा, एखाद्या व्यक्तीला सतत थकवा किंवा अशक्तपणा जाणवतो आणि अगदी थोड्याशा शारीरिक हालचालीनेही श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो किंवा चक्कर येऊ शकते. हात आणि पायांमध्ये मुंग्या येणे, सुन्न होणे ही देखील सामान्य लक्षणे आहेत. त्वचा पिवळी पडणे, चेहरा निस्तेज होणे, स्कीन कोरडी होणे ही देखील याच्याच कमतरतेची लक्षणे असू शकतात. याव्यतिरिक्त, वारंवार तोंडात अल्सर येणे आणि कमकुवत रोगप्रतिकारक शक्ती ही देखील व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेची लक्षणे आहेत. जर तुम्हाला यापैकी कोणतीही लक्षणे आढळली तर ताबडतोब रक्त तपासणी करा आणि तुमच्या बी १२ च्या पातळीची तपासणी करा.

**दूध आणि दुग्धजन्य पदार्थ**

दूध, दही, ताक, पनीर, चीज यांसारखे पदार्थ इ१२ चे चांगले स्रोत आहेत. दिवसातून एक-दोन ग्लास दूध किंवा



एका वाटी दहीचं सेवन केल्यानं शरीराची बी १२ ची गरज मोठ्या प्रमाणात भागते. यातील प्रोबायोटिक्स पचनशक्ती सुधारतात, ज्यामुळे पोषक तत्त्वांचं शोषण अधिक चांगलं होतं. पनीर आणि चीज हे फक्त प्रोटीन आणि कॅल्शियमसाठीच नव्हे तर व्हिटॅमिन बी १२ साठीही उत्तम आहेत.

**मशरूम**

मशरूम, विशेषतः शीटाके मशरूम, व्हिटॅमिन बी १२ चं उत्तम स्त्रोत मानलं जातं. ते शरीरातील नर्व्ह आणि मेंदूचं कार्य नीट चालू ठेवण्यात मदत करतं. नियमितपणे मशरूमचं सूप, स्टर-फ्राय किंवा भाजीच्या स्वरूपात सेवन केल्याने शरीराची ऊर्जा वाढते आणि रोगप्रतिकारक शक्ती सुधारते. शाकाहारी लोकांसाठी हा पर्याय विशेष फायदेशीर आहे.

**अंडी**

अंडं हे व्हिटॅमिन बी १२ चं सोपं आणि प्रभावी साधन आहे. विशेषतः पिवळ्या बलकात बी १२ ची मात्रा जास्त असते, तर पांढऱ्या भागात प्रोटीन भरपूर असतं. दररोज एक उकडलेलं अंडं घेतल्यास शरीराला दिवसाच्या गरजेचं जवळपास चतुर्थांश बी १२ मिळतं. त्यामुळे जे लोक अंडं खातात, त्यांना बी १२ च्या कमतरतेचा धोका तुलनेने कमी असतो.

**फळं, सुका मेवा आणि बीया**



संत्रं, केळं, सफरचंद यांसारख्या फळांमध्ये थोड्याफार प्रमाणात बी १२ असतं. त्याचबरोबर बदाम, शेंगदाणे, आणि भाजलेले चणे यांसारख्या पदार्थांमधूनही शरीराला पोषक मदत मिळते. हे पदार्थ रक्ताभिसरण सुधारतात आणि सतत ऊर्जा देतात.

**फोर्टिफाइड पदार्थ आणि सप्लिमेंट्स**

आजच्या काळात फोर्टिफाइड दूध, सीरियल्स, सोया आणि बदाम दूध यांसारख्या वस्तूंमध्ये अतिरिक्त बी १२ मिसळलेलं असतं. हे पूर्ण शाकाहारी लोकांसाठी उत्तम पर्याय आहेत. जर शरीरात बी १२ ची कमतरता अधिक असेल आणि थकवा, चक्कर, झिणझिण्या यांसारखे लक्षणं जाणवत असतील, तर डॉक्टरांच्या सल्ल्यानं सप्लिमेंट्स घ्यावेत. हे केवळ व्हिटॅमिनची कमतरता भरून काढत नाहीत, तर मेंदूची कार्यक्षमता, लक्ष केंद्रित ठेवण्याची क्षमता आणि पचनक्रियाही सुधारतात.

# नरकासुराचा वध, राजा बळीची पूजा, तेलाने स्नान.



नरकासुराचा वध, राजा बळीची पूजा, तेलाने स्नान... दक्षिण भारतात दिवाळीचा अनोखा उत्सव

दिवाळीचा सण जवळ येत आहे आणि संपूर्ण उत्तर भारत त्याच्या उत्साहात जोरदार तयारी करत आहे. नवरात्रीनंतरच्या करावा चौथपासून दिवाळीचे दिवस मोजण्यास सुरुवात होते. तसेच, दक्षिणेत दिवाळी साजरी करण्याची परंपरा उत्तर भारतात तितकी प्रचलित नाही. दक्षिण भारतातही हा सण साजरा केला जातो, पण थोड्या वेगळ्या पद्धतीने. चला जाणून घेऊया की दक्षिण भारतातील दिवाळी उत्तरेपेक्षा कशी वेगळी आहे? दक्षिणेकडील राज्यांमध्ये या काळात कोणत्या परंपरा पाळल्या जातात?

उत्तर भारतात अशी एक सामान्य धारणा आहे की भगवान रामाने लंकेचा राजा रावणावर विजय मिळविण्यासाठी देवीची पुजा केली. त्याला पराभूत करण्यात ते यशस्वी झाले आणि नंतर लंकेहून अयोध्येला परतले. रामाच्या परतण्याची बातमी मिळताच, अयोध्येच्या रहिवाश्यांनी संपूर्ण शहर सजवले, दिवे लावले आणि त्यांच्या आगमनाचा आनंद साजरा केला. या प्रसंगाचे स्मरण करण्यासाठी उत्तर भारतात दिवाळी साजरी केली जाते.

त्तर भारतापेक्षा काय वेगळेपणा?

उत्तर भारतात दिवाळीची सुरुवात धनतेरसने होते असे मानले जाते. दिवाळीच्या दोन दिवस आधी धनतेरस येतो. त्याआधी घरे स्वच्छ केली जातात. धनतेरसला मिठाई तयार केली जाते. सोन्या-चांदीचे दागिने आणि नाणी, चांदी आणि इतर धातूंपासून बनवलेली भांडी इत्यादी खरेदी केली जातात. शिवाय, या दिवशी झाडू आणि धने खरेदी करणे शुभ मानले जाते. कालांतराने, या वस्तू वाढल्या आहेत आणि आता लोक या दिवशी वाहने देखील खरेदी करतात. दिवाळीच्या दिवशी लोक विशेषतः भगवान गणेशासह देवी लक्ष्मीची पूजा करतात. घरांमध्ये मातीचे दिवे लावले जातात आणि रंगीबेरंगी दिवे लावले जातात. घरे फुलांनी आणि रांगोळीने सजवली जाते.

उत्तर भारतात, दिवाळीचे एक प्रमुख आकर्षण म्हणजे फटाके. शिवाय, दिवाळी ही हिंदू आर्थिक वर्षाची सुरुवात देखील दर्शवते. म्हणून व्यापारी देखील हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करतात. उत्तर भारतातील अनेक भागात रामायणातील दृशे दर्शवणारी पथनाट्ये देखील सादर केली जातात. दिवाळीला फटाके फोडण्याची परंपरा बऱ्याच काळापासून चालत आली आहे. परंतु दक्षिणेत दिवाळी खूप वेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते.

दक्षिण भारतातील राज्यांमधील विविध परंपरा

दक्षिण भारतातील राज्यांमध्ये दिवाळी साजरी करण्याची परंपरा थोडी वेगळी आहे. त्या संबंधित वेगवेगळ्या श्रद्धा आहेत. तमिळनाडूमध्ये दिवाळी नरक चतुर्दशी म्हणून साजरी केली जाते. तमिळनाडूप्रमाणेच केरळमध्येही असा विश्वास आहे की हा सण भगवान श्रीकृष्णाने नरकासुर राक्षसाच्या वधाचे प्रतीक आहे. शिवाय, दक्षिण भारतात या दिवशी राजा बालीची पूजा केली जाते.

हा उत्सव नरकासुराच्या वधाचे प्रतीक आहे.

दक्षिण भारतात, उत्तरेपेक्षा दिवाळी कमी थाटामाटात साजरी केली जाते. खरं तर, भारतातील दक्षिणेकडील राज्यांमध्ये, दिवाळी त्या दिवशी साजरी केली जाते जेव्हा भगवान श्रीकृष्णाची पत्नी सत्यभामा हिने त्यांना नरकासुराचा वध करण्यास सांगितले होते. ही तारीख सहसा दिवाळीच्या एक दिवस आधी येते. दिवाळी आमवस्येच्या दिवशी साजरी केली जाते. दक्षिण भारतात, नरक चतुर्दशी ही उत्सवाची खरी सुरुवात आहे.

राजा बळीची पूजा

दक्षिण भारतात, राजा बळी यांची विशेष पूजा केली जाते. असे मानले जाते की त्रेता युगात बळी एक शक्तिशाली आणि धार्मिक राजा होता. त्याचे राज्य विशाल आणि समृद्ध होते. तो एक महान परोपकारी देखील होता, ज्याची कीर्ती दूरवर पसरली होती. तो त्याच्या परोपकारासाठी ओळखला जात असे आणि त्याच्या प्रजेच्या कल्याणासाठी नेहमीच काम करण्यास तयार असे. असे म्हटले जाते की एके दिवशी, राजा बळीची परीक्षा घेण्यासाठी, भगवान विष्णूने वामनाचे रूप धारण केले. त्याने त्याच्याकडे जाऊन तीन पावले जमीन मागितली. राजा बळीने संकोच न करता त्याला तीन पावले देण्याचे वचन दिले, म्हणून भगवानांनी एका पावलात संपूर्ण पृथ्वी आणि दुसऱ्या पावलात संपूर्ण स्वर्ग मोजला. त्यानंतर राजा बली त्याच्यासमोर झोपला आणि त्याचे शरीर त्याला अर्पण केले. यावर प्रसन्न होऊन, भगवान विष्णूने त्याला पाताळाचा राजा बनवले आणि त्याला वरदान दिले की तो वर्षातून एकदा आपल्या प्रजेला भेटण्यासाठी पृथ्वीवर परत येईल. तेव्हापासून, राजा बळी दिवाळीला आपल्या प्रजेला भेट देतो असे मानले जाते. म्हणूनच लोक राजा बळीच्या पुतळ्यासमोर किंवा चित्रासमोर दिवे लावतात आणि मिठाई अर्पण करतात.

तेल स्नानाची परंपरा

दक्षिण भारतात, नरक चतुर्दशी हा सण सामान्यतः घरांची स्वच्छता, तेलाने स्नान आणि मिठाई खरेदी करून साजरा केला जातो. लोक नवीन कपडे घालतात आणि एकमेकांशी मिठाईची देवाणघेवाण करतात. परंतु, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशसह अनेक दक्षिणेकडील राज्यांमध्ये, नरक चतुर्दशीला तसेच दिवाळीला फटाके फोडण्याची परंपरा आता उत्तर भारताप्रमाणेच वेगाने वाढत आहे.

# वजन कमी करण्याचा सोपा आहाराद्वारे मार्ग !

मुंबई : आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक लोक अनियमित आहार, लेट नाईट पार्ट्या आणि चुकीच्या खानपानाच्या सवयींमुळे वजनवाढीच्या समस्येला सामोरे जातात. सकाळचा आहार महत्त्वाचा मानला जातो, पण वजन कमी करायचं असल्यास रात्रीचा आहार देखील तितकाच महत्त्वाचा आहे. कारण दिवसाच्या शेवटी आपण जे खातो, त्याचा थेट परिणाम आपल्या झोपेवर, पचनावर आणि शरीरातील चरबीवर होतो. जर रात्री हलका, पौष्टिक आणि पचायला सोपा आहार घेतला, तर शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होण्यास मदत होते. परंतु तेलकट, मसालेदार आणि जड अन्नामुळे वजन वाढते तसेच झोपेतही अडथळा येतो. म्हणूनच तज्ज्ञ रात्रीच्या जेवणात कमी कार्ब आणि जास्त प्रथिने व फायबरयुक्त पदार्थ समाविष्ट करण्याचा सल्ला देतात.



# अजाणांच्या ओठी

भारतात सर्वात जास्त दुर्लक्ष केले जात असेल तर ते मुलांच्या आरोग्याकडे. त्यातही सरकारी संस्था असतील तर या दुर्लक्षाचे परिणाम फारच भयंकर होतात. देशात एकूणच आरोग्यावर सरकार केवळ वित्त वर्ष २०२६ च्या अर्थसंकल्पानुसार २ टक्के खर्च करते. ही आकडेवारी केवळ २०२६ ची आहे. त्यापूर्वी कितीतरी लोकांनी सरकारच्या आरोग्यावरील अपुऱ्या उपाययोजनेमुळे आपले प्राण गमावले असतील त्याची कल्पना करणे अशक्य आहे. पण काल मध्य प्रदेशमध्ये ९ आणि राजस्थानात २ जणांचा बळी याच कफ सिरपमुळे गेला आणि त्यानंतर सरकारी यंत्रणा खडबडून जागी झाली. मग कोल्ड्रिफ या कफ सिरपवर बंदी आणली गेली आणि हे विषारी किंवा कंटॅमिनेटेड कफ सिरपचे जाळे केवळ मध्य प्रदेश अथवा राजस्थानमध्येच नव्हते, तर त्याची व्याप्ती तामिळनाडूतही पसरली आहे असे लक्षात आले. या कोल्ड्रिफमध्ये डाय इथिलीन ग्लायकोल हा विषारी पदार्थ अत्यंत धोकादायक अवस्थेत आढळला. ज्याचे प्रमाण ४८.६ टक्के इतके होते. सहसा कोणत्याही कफ सिरपमध्ये या घातक पदार्थाचे प्रमाण जागतिक आरोग्य संघटनेकडून केवळ ०.१० टक्के इतके असण्यास मान्यता आहे. इतक्या जास्त प्रमाणात या पदार्थाची कफ सिरपमध्ये उपस्थिती ही त्याच्या घातकपणाची साक्ष आहे पण ते औषध देणाऱ्या डॉक्टर्सची कंपन्यांशी असलेली साठगाठ दाखवून देणारी आहे. आता केंद्र सरकार आणि मध्य प्रदेश सरकारने डॉक्टरांसाठी सल्लापत्र जारी केले आहे, की त्यांनी दोन वर्षांखालील मुलांसाठी तरी हे कफ सिरप आपल्या औषध योजनेत देऊ नये. पण हे उशिरा आलेले शहाणपण झाले. त्या आधी जी अकरा बालके दगावली त्यांच्या जिवांची कोण जबाबदारी घेणार हा प्रश्न तसाच आहे. जी मुले या प्रकरणात दगावली आहे, ती गरीब किंवा मध्यमवर्गीय परिवारांतील आहे. त्यांच्या आईवडिलांकडे यंत्रणेला जाब विचारण्याची क्षमता नाही. त्यामुळे या असहाय्य आईवडिलांनी आपल्या मुलांच्या यमदूताकडे म्हणजे डॉक्टरांच्या कृत्यांकडे असहाय्यपणे पाहत बसावे का, असा प्रश्न उरतो. औषध तयार करणाऱ्यांनी आपल्या नैतिकतेशी तडजोड करत ही विषारी द्रव्य असलेली कफ सिरप विकली आहे. यंत्रणेविरोधात दाद मागण्याची सामान्य माणसात ताकद नसतेच त्यामुळे हे प्रकार चालतात. काही दिवस हे गाजेल आणि नंतर बासनात गुडांळून ठेवले जाईल. कफ सिरपमध्ये डाय इथिलीन ग्लायकोलचे प्रमाण असल्याची पुष्टी केली आहे. पण तामिळनाडूमधील उत्पादक कंपनीला इतक्या प्रमाणात हा विषारी पदार्थ वापरण्याची परवानगी कुणी व का दिली हा यातील महत्त्वाचा मुद्दा आहे. मध्य प्रदेशातील छिंदवाडा येथील सहा आणि राजस्थानातील दोन बालके या कफ सिरपमुळे दगावली. याला सरकारी यंत्रणा जबाबदार आहे, यात काही शंका नाही. भाजपची सरकारे असलेल्या राज्यात हे प्रकार झाल्याने तेथील यंत्रणा दोषी आहे, असा दावा कुणी केला तर त्यासारखे हास्यास्पद तोच असेल. पण या प्रकरणाची निष्पक्षपाती चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करायला हवी. आरोग्य मंत्रालयानेही पुष्टी केली आहे, की त्यांच्या तामिळनाडूमध्ये असलेल्या कोल्ड्रिफ या कफ सिरपमध्ये डाय इथिलीन ग्लायकोलचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे दोन वर्षांच्या आतील बालके या औषधामुळे दगावली आहे. पण केंद्र सरकारच्या चाचणीत असे आढळले आहे, की कोणतेही दूषित पदार्थ कफ सिरपमध्ये आढळला नाही. सीडीसीएसओने आपल्या ताज्या अहवालात म्हटले आहे, की कोणत्याही कफ सिरपमध्ये असा कोणताही दूषित पदार्थ आढळला नाही. असे असले तरीही या ११ मुलांच्या मृत्यूची जबाबदारी कोणत्याही सरकारला टाळता येणार नाही. केंद्र सरकारने कफ सिरपला क्लीन चिट दिले असले, तरीही त्यामुळे लहान मुलांचे मृत्यू झाले हे सत्य नाकारता येणारे नाही. केंद्र सरकारने केंद्रशासित प्रदेशांना कफ सिरपचा वापर करू नये म्हणून कडक आदेश दिले. राज्यांनी या विषयावर जी सतर्कता दाखवली आहे ती कौतुकास्पद आहे. कफ सिरपच्या उत्पादनावर हिमाचलमध्ये बंदी आणली आहे आणि तामिळनाडूत तर बंदी आहे. आपल्याकडे कफ सिरप अगोदर निरूपद्रवी औषध म्हणून उपयोगात आणले जात होते पण त्यानंतर झोपडपट्टीतील मुलांनी आणि कित्येक तरुणांनीही कफ सिरपचा मादक पदार्थ म्हणून वापर सुरू केला होता. त्यामुळेच त्याच्यावर आधीच बंदी होती.



सहा राज्यांत या कफ सिरपचे निरीक्षण करण्यात आले आणि त्यात दूषित पदार्थाचे प्रमाण वाजवीपेक्षा जास्त आढळले आहे. कफ सिरप हे फक्त खोकल्यावर दिले जाते आणि त्याचा उपयोग पुढे तरुणांकडून नशेसाठी केला जाऊ लागला. पण आता तर हे लहान मुलांचे बळी घेणारे ठरले आहे आणि ही चिंताजनक बाब आहे. त्यामुळे सरकारने जागरूक होऊन कफ सिरपच्या वापरावरच बंदी आणली आहे. कफ सिरपच्या वापरामुळे लोकांना विशेषतः बालकांना उच्च रक्तदाब, अनियमित हृदयाचे ठोके आणि मानसिक तसेच अस्वस्थ वाटणे असे परिणाम संभवतात. लहान बालके हे सांगू शकत नाही. त्यामुळे कित्येक तर मृत्यूला कवटाळतात. कधी-कधी या निरूपद्रवी वाटणाऱ्या कफ सिरपचे परिणाम भयंकर ठरतात. त्यामुळे आता सरकारने जी कृती केली आहे ती अत्यंत स्वीकारार्ह आणि योग्य आहे.

तसेच कोरड्या खोकल्यासाठी कफ सिरप डॉक्टर लिहून देत असत. पण आता केंद्र सरकारने जारी केलेल्या सल्लापत्रामुळे तसे होणार नाही आणि यापुढे तरी बालके सुरक्षित राहतील अशी आशा बाळगण्यास जागा आहे. अन्न आणि औषध प्रशासन यांनी १८ किंवा त्यापेक्षा लहान मुलांसाठी कफ सिरप सुरक्षित नाही असे लिहून दिले आहे. पण तरीही आपल्याकडे नशा किंवा अन्य कारणांसाठी हे कफ सिरपचे सेवन केले जाते. आता या कफ सिरपवर कडक बंदी आणली पाहिजे. लहान मुले जी गेली आहे त्यांच्या आत्म्यांचा तळतळाट त्यामुळे आता तरी लागणार नाही. छिंदवाडातील मृत बालकांच्या मृत्यूंची संख्या १२ वर पोहोचली असताना कोल्ड्रिफचे बळी ते असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे आता कोल्ड्रिफवर बंदी आली आहे, पण त्यांच्या शरिरांत विषारी पदार्थ असल्याचे आढळले आहे. ही निश्चितच भारताच्या आरोग्य क्षेत्रासाठी स्पृहणीय बाब नाही.

## डॉक्टर टीप्स

**शिंकताना किंवा खोकताना लघवी होत असेल तर असू शकतो हा आजार...**

### हेल्थ टिप्स



शिंक किंवा खोकला आल्यावर कधी-कधी नकळत लघवी होते. त्यामुळे कपडे आणि घरातून बाहेर असल्यास अशा वेळी परिस्थिती निर्माण होते. संपूर्ण जगात ३ महिलांपैकी १ तरी या त्रासाला सामोरा जावं लागतं. या त्रासाला यूरिनरी इनकॉन्टिनेंस (मूत्रावरचे अनियंत्रण) असे म्हटले जाते. हा आजार पुरुषांमध्ये ही आढळतो पण त्यांचा दर स्त्रियांच्या तुलनेत कमी आहे. पुरुषांमध्ये ८ पैकी एकाला अशी समस्या असू शकते.

मूत्रमार्गाचे अनियंत्रण म्हणजे माणसाची इच्छा नसूनही शरीरातून लघवी स्वतःच बाहेर पडणे. आपले मूत्र मूत्राशयात साठवले जातात. ज्यावेळी मूत्राशय भरायला सुरुवात होते त्यावेळी आपल्याला लघवी येते. काही जण लघवी आल्यावरही जात नाही आणि लघवी थांबवतात. अशात स्नायू कमकुवत झाल्यास अनियंत्रणाचा त्रास उद्भवतो. अश्या (**क्रमशः**)

## विनोद




**श्याम : छे, किती गिचमिड अक्षर. मला नाही वाचता येत.**

**राम : किती चांगले अक्षर आहे. एखादा मुर्खसुद्धा वाचेल. दे पाहू इकडे मी वाचतो.**

## संदेश

Doctor: tum abhi 2 ganto main mar jaanewaale ho. kya tumhaara koi aakhri khwaaish hai?

Patient: Haanji, ek achche doctor ko consult karna hai

## सुविचार

क्रोधाला लगाम घालण्यासाठी मौनाइतका उत्तम मार्ग नाही.

**- महात्मा गांधी**

### संस्कृत सुभाषित

**अनित्यं यौवनं रुपंजीवितं द्रव्यसंचयः**

**आरोग्यं प्रियसंवासो गृध्येत्तत्र न पंडितः ।।**

**(शांतीपर्व, अध्याय ३३०, ेक १४, महाभारत)**

**अर्थ** -तारुण्य, रुप, आयुष्य, संपत्ती व प्रियजनांचा सहवास हे सर्व अशाश्वत आहे. शहाण्या पुरुषाने त्याचा लोभ धरू नये.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. अनुभवाशिवाय ज्ञान नाही या अर्थाची म्हण
६. सासऱ्याच्या घरीच कायमचा मुक्काम ठोकणारा
१०. माराची खूण
११. लोखंड घासण्याचे हत्यार
१२. सर्प
१३. पशुरूपी संपत्ती
१५. डावखोरा
१७. नेहमी
१८. कान स्वच्छ करण्याचे साधन
२०. देवळाची पहिली पायरी
२२. अतिभव्य
२३. कापडाचा तागा
२४. पडीक जमीन
२५. जळण्याचा वास
२६. मेहरबानी
२९. जड वस्तू नेण्यासाठी वापरावयाचे बांबूचे साधन
३०. भरपूर, खूप प्रमाणात
३३. चेहऱ्यावरील तेज
३४. क्षण (हिंदी)
३५. पत्त्यातील आठ
३६. याठिकाणी नक्षीकामामुळे साडीला वजन येते
३८. लग्नाचे वेळी वरात आणणारा वधूचा भाऊ
४०. सवय, राबता
४२. छोटे कुबड
४३. नखापाशी झालेला रोग
४५. मुलांचा फळीवरुन घसरण्याचा खेळ
४९. आगबोट
५१. खोपोलीजवळचा वृद्धाश्रम
५१अ. धाव (इंग्रजी)
५२. शाहरुख खलनायकाच्या भूमिकेत
५३. सुखद थंडावा
५५. वर्तमानपत्रातील कप्पा
५७. एक बारीक धान्य
५९. नाशिकहून मुंबईला उतरणारा घाट
६०. च्या बरोबर
६२. किल्याभोवतीची भिंत
६५. एकलकोंडा
६७. फळा-फुलाचा झाडाला जोडणारा भाग
६९. मांडणी
७०. श्रीमंत
७२. एकमेकांचे वर्म काढणे, नावे ठेवणे
७४. अविवाहित
७५. वारा
७७. सगळे (हिंदी)
७९. आहार असा असावा
८१. दीनवाणा
८४. त्रिदलांचा एक वृक्ष
८६. संगीतसम्राट
८८. '---- उघड दार देवा आता, उघड दार देवा'
९१. सरळ लांब वासा
९२अ. तडाखा
९३. निष्णात, तरबेज
९५. खोबऱ्याची बर्फी
९६. आंतरिक इच्छा
९७. अनुपम

## उभे शब्द

१. चेष्टेत दहावा ग्रह
२. समय, अवधी
३. नमस्कार
४. रंग बदलणारे फूल
५. ओला आणि सुका वेगळा करावा!
६. गर्द (रान)
७. द्रव, पाझर
८. भार, बोजा
९. डोळ्यावरचा उघडझाप होणारा अवयव
११. बैलाच्या शिंगाचा दोर
१२. मोदकामध्ये भरलेले
१३. गाईंना सांभाळणारा
१४. संपत्ती
१६. सामिष पदार्थांसाठी ग्रामीण बोलीतील शब्द
१८. अगदी नुकतेच सरलेले दिवस
१९. धान्यघर
२०. विवाहविच्छेद
२१. शाब्दिक हजामत
२२. उशीर
२५. या फळात अमृतबीज असते असे शिवफक्त मानतात
२७. शरीर
२८. चिक्कूसाठी प्रसिद्ध गाव
२९. चुलता
३१. चटकन, त्वरित
३२. हात
३४. ऐसपैस, विखरून
३५. सोपे नसलेले
३७. रत्नमाला
३९. लगबग, धांदल
४१. काळजी, चिंता
४४. कोवळ्या दुधाचा पदार्थ
४६. न उचलता दुसऱ्या जागी हलवणे
४७. फसवून पळून जाणे
४८. अंकुर
५०. जकात घेण्याची जागा
५४. गंध
५६. अपशकुन
५७. जसे काही
५८. सांकेतिक चिन्ह
६१. पराजित होणे
६३. मराठीत बांधून ठेवणारे, हिंदीत बांधून ठेवलेला
६४. केविलवाणा
६५. प्रतिष्ठा, सन्मान
६६. डोसा, आंबोळी
६८. चोरावर मोर
७१. प्रहार, घाव
७२. शिसारी, अतिशय कंटाळा
७३. दोन नदीप्रवाहांमधील जमिनीचा भाग
७३अ. शैली, ढंग
७५. गुंतवणुकीवरील मोबदला
७६. वस्त्र, कापड
७८. ढगाळ वातावरण
८०. कर्णेंद्रिय
८२. पद्धतीनुसार
८३. खूप, पुष्कळ
८४. तपासनीस
८५. जबरदस्ती
८५अ. लघळ
८७. सेनानी, सेनानायक
८९. समर्थ स्थापित अकरा मारुतींपैकी एक
९०. मक्ता
९२. एक ज्वालाग्राही पदार्थ
९४. खूळ, लहर

## आडवे उत्तर

१.जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे ६.घरजावई १०.वळ ११.कानस १२.साप १३.गोधन १५.डावरा १७.सदा १८.कानकोरणी २०.सोपान २२.विराट २३.ठाण २४.पडळ २५.करपट २६.उपकार २९.कावड ३०.मुबलक ३३.रया ३४.पल ३५.अठ्ठी ३६.काठपदर ३८.वरधावा ४०.सव ४२.पोक ४३.नखरूड ४५.घसरगुंडी ४९.जहाज ५१.रमाधाम ५१अ.रन ५२.डर ५३.गारवा ५५.रकाना ५७.जव ५९.कसारा ६०.सह ६२.तटबंदी ६५.माणूसघाणा ६७.देठ ६९.रचना ७०.धनवान ७२.उणे दुणे काढणे ७४.कवार ७५.पवन ७७.सब ७९.चौरस ८१.गरीब ८४.पळस ८६.तानसेन ८८.देहाची तिजोरी भक्तीचाच ठेवा ९१.सरा ९२अ.फटका ९३.पटू ९५.नारळपाक ९६.कळकळ ९७.अप्रतीम

## उभे उत्तर

१.जावई २.वेळ ३.वंदन ४.तेरडा ५.कचरा ६.घनदाट ७.रस ८.वजन ९.पापणी ११.कासरा १२.सारण १३.गोपाळ १४.धन १६.वशाट १८.कालपरवा १९.कोठार २०.सोडचिठ्ठी २१.खरडपट्टी २२.विलंब २५.कवठ २७.काया २८.घोलवड २९.काका ३१.लवकर ३२.कर ३४.पसरून ३५.अवघड ३७.रत्नहार ३९.धावधाव ४१.घोर ४४.खरवस ४६.सरकवणे ४७.गुंगारा देणे ४८.डीर ५०.जकातनाका ५४.वास ५६.नाट ५७.जणू ५८.खुणा ६१.हरणे ६३.बंधक ६४.दीनवाणा ६५.मान ६६.घावन ६८.ठकास महाठक ७१.वार ७२.उबग ७३.दुआब ७३अ.ढब ७५.परतावा ७६.वसन ७८.मळभ ८०.कान ८२.रीतसर ८३.अतिशय ८४.परीक्षक ८५.सक्ती ८५अ.लोचट ८७.सेनापती ८९.चाफळ ९०.ठेका ९२.राळ ९४.टूम



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त



### दक्षिण आफ्रिकेचा विजयी चौकार

नवी दिल्ली–महिला विश्वकप स्पर्धेतील १८व्या लीग सामन्यात दक्षिण आफ्रिकेने श्रीलंकेचा १० गडी राखून पराभव केला आहे. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने सलग चौथा विजय नोंदवत गुणतालिकेत दुसरे स्थानही पटकावलं आहे.

पावसामुळे हा सामना २० षटकांचा खेळवण्यात आला. महत्त्वाचे म्हणजे आफ्रिकेच्या या विजयाने भारताची धाकधूक वाढली असून भारताचे टॉप ४ मधील स्थान धोक्यात आले आहे. या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. पहिल्या १२ षटकांत श्रीलंकेने २ गडी गमावत केवळ ४६ धावा केल्या. मात्र, त्यानंतर पावसामुळे खेळ थांबवण्यात आला. जवळपास पास तासांच्या प्रतीक्षेनंतर अखेर सामना पुन्हा सुरु झाला. मात्र, हा सामना २०–२० षटकांचा होणार असल्याचे जाहीर करण्यात आले. त्यामुळे श्रीलंकेने २० षटकांत ७ गडी गमावत १०५ धावांचे लक्ष्य ठेवले. श्रीलंकेकडून विश्मी गुणरत्नेने सर्वाधिक ३४ धावा केल्या. पण याशिवाय इतर कोणत्याही फलंदाजाला २० धावांचा टप्पा गाठता आला नाही. दक्षिण आफ्रिकेकडून मारिजाने कॅप आणि नॉनकुलुलेको म्लाबा यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले. तर मसाबाता क्लासने २ आणि नादिन डी क्लर्कने १ विकेट घेतली.दरम्यान, आफ्रिकेच्या या विजयाने भारताची धाकधूक वाढली आहे. भारताचं टॉप ४ मधील स्थान धोक्यात आले आहे. गुणतालिकेबाबत बोलायचे झाल्यास ऑस्ट्रेलियाकडे ९ गुण आहेत. त्यांनी यापूर्वीच सेमीफायनलचे तिकीट निश्चित केले आहे. तर आफ्रिका ८ गुणांसह दुसऱ्या स्थानावर असून त्यांचे काही सामने बाकी आहेत. यापैकी एक सामना जरी जिंकला, तरी त्यांची सेमीफायनलकडे जाण्याची वाट मजबूत होणार आहे. याशिवाय इंग्लंडने ७ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे, तर न्यूझीलंडकडे ३ गुण आहेत.

***

### दांडपट्ट्यागत बॅट फिरवली, ११ चौकार अन् षटकारांच्या मदतीने



कानपूर : रणजी ट्रॉफी २०२५–२६ हंगामाला जोरदार सुरुवात झाली असून, उत्तर प्रदेशचा स्टार फलंदाज रिंकू सिंग याने आपल्या पहिल्याच सामन्यात धुमाकूळ घातला आहे. उत्तर प्रदेश विरुद्ध आंध्र (र्णीरी झीरवशीह ी -पवहीर) या सामन्यात, आंध्रच्या संघाने पहिल्या डावात फलंदाजी करताना ४७० धावांचा मोठा डोंगर उभारला. या आव्हानात्मक धावसंख्येसमोर उत्तर प्रदेश (णझ) संघाची सुरुवात खराब झाली, आणि संघ अडचणीत सापडला. नेमक्या अशा कठीण परिस्थितीत रिंकू सिंग मैदानात आला आणि त्याने वादळी खेळी करत दमदार शतक झळकावले. रिंकू सिंगने सहकारी फलंदाज विपराज निगम याच्यासोबत महत्त्वाची शतकी भागीदारी रचली. या भागीदारीमुळे उत्तर प्रदेशचा संघ पुन्हा एकदा सामन्यात जोरदार पुनरागमन करू शकला. रिंकू सिंगची ही खेळी उत्तर प्रदेशसाठी संजीवनी ठरली आहे.नंदुरबारच्या चांदशैली घाटात भीषण अपघात; भाविकांची पीकअप जीप दरीत कोसळून ६ ठार, १५ हून अधिक गंभीर जखमीनंदुरबार : नंदुरबार जिल्ह्यात आज सकाळी एक हृदयद्रावक आणि भीषण अपघात घडला आहे. भगवान अस्तंबा ऋषी यांच्या यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांच्या पीकअप जीपला ...रिंकू सिंगचे रणजीमध्ये फर्स्ट क्लास आठवे दमदार शतककर्णधार करण शर्मा बाद झाल्यानंतर, रिंकू सिंग (ठळपर्झी डळपसह) मैदानात उतरला, त्यावेळी उत्तर प्रदेश (णझ) संघाची धावसंख्या १४६/३ अशी होती. यानंतर लगेचच आर्यन जुयाल (६६) आणि भारताच्या अंडर–१९ संघाचा माजी कर्णधार प्रियम गर्ग (१८) हे महत्त्वाचे फलंदाजही पॅव्हेलियनमध्ये परतले. १७८ धावांवर यूपीची अर्धी टीम माघारी परतल्याने संघ मोठ्या संकटात सापडला होता. अशा परिस्थितीत रिंकूने प्रथम अराध्य यादवसोबत (१७) सहाव्या विकेटसाठी ४८ धावांची भागीदारी करत डाव सावरला. अराध्य बाद झाल्यानंतर रिंकूला आयपीएल स्टार विपराज निगमची चांगली साथ मिळाली.शुक्रवारच्या (तिसऱ्या दिवसाच्या) अखेरीस या दोघांनी मिळून संघाचा स्कोअर ६ बाद २९४ पर्यंत पोहोचवला. त्यावेळी रिंकू ८२ धावांवर नाबाद होता, तर यूपी संघ आंध्रपेक्षा १७६ धावांनी मागे होता.

## रणजी ट्रॉफीत मोहम्मद शमीचा धमाका; अनफीटम्हणणाऱ्यांना दिलं चोख प्रत्युत्तर



***मोहम्मद शमी गेल्या काही महिन्यांपासून भारतीय संघात पुनरागमन करण्याच्या प्रयत्नात आहे. दरम्यान रणजी ट्रॉफी स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात त्याने दमदार कामगिरी केली आहे.***

**नवी दिल्ली:** भारतीय संघातील वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी भारतीय संघात पुनरागमन करण्याच्या प्रयत्नात आहे. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धा झाल्यानंतर शमीला एकही सामना खेळण्याची संधी मिळालेली नाही. सध्या तो रणजी ट्रॉफी स्पर्धेत बंगाल संघाचं प्रतिनिधित्व करत आहे. या स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात दमदार कामगिरी करून त्याने निवडकर्त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. रणजी ट्रॉफी २०२५–२६ स्पर्धेला सुरुवात झाली आहे. या स्पर्धेत बंगालचा पहिला सामना उत्तराखंड संघासोबत सुरू आहे. या सामन्यातील दोन्ही डावात शमीने दमदार कामगिरी केली आहे. या सामन्यातील पहिल्या डावात गोलंदाजी करताना त्याने १४.५ षटकात अवघ्या ३७ धावा खर्च करत ३ गडी बाद केले. तर दुसऱ्या डावात गोलंदाजी करताना त्याने २४.४ षटकात ३८ धावा खर्च करत ४ गडी बाद केले. दोन्ही डावात त्याने ७ गडी बाद करून आपण फिट आहोत, हे निवडकर्त्यांना दाखवून दिलं आहे.गोलंदाजीत ७ गडी बाद करणाऱ्या शमीने फलंदाजी १० धावा देखील केल्या. पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या उत्तराखंड संघाला २६५ धावा करता आल्या. प्रत्युत्तर देण्यासाठी आलेल्या बंगाल संघाने पहिल्या डावात ३२३ धावा केल्या. दुसऱ्या डावात उत्तराखंड संघाला अवघ्या २१३ धावा करता आल्या आहेत. त्यामुळे बंगाल संघाला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या १५५ धावा करायच्या आहेत. ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी निवडण्यात आलेल्या भारतीय संघात मोहम्मद शमीला स्थान दिलं गेलं नव्हतं. यामागचं कारण विचारलं असता, मुख्य निवडकर्ते अजित आगरकर यांनी सांगितलं होतं की, मोहम्मद शमी पूर्णपणे फिट नसल्यामुळे त्याला संघात स्थान दिलं गेलेलं नाही. पण शमीने आता दमदार कामगिरी करून आपण पूर्णपणे फिट आहोत हे दाखवून दिलं आहे. अजित आगरकरांनी फिटनेसचं कारण दिल्यानंतर शमीने जोरदार प्रत्युत्तर देखील दिलं होतं. पण यावेळी त्याने आपल्या कामगिरीने सर्वांची बोलती बंद केली आहे. आता रणजी ट्रॉफी स्पर्धेत दमदार कामगिरी करूनही शमीला भारतीय संघात स्थान मिळणार का? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

## वेस्ट इंडिजचा संघ भारतापाठोपाठ बांगलादेशकडूनही चीतपट

दिल्ली–भारत दौऱ्यात दोन्ही कसोटीत पराभवाचा सामना करावा लागलेल्या वेस्ट इंडिजला बांगलादेश दौऱ्यातील पहिल्या वनडे सामन्यातही पराभवाचा दणका बसला. विजयासाठी २०८ धावांचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजची स्थिती ७९१ अशी होती. मात्र त्यानंतर रिषाद हुसेनच्या फिरकीसमोर वेस्ट इंडिजने लोटांगण पत्करलं आणि त्यांचा डाव १३३ धावांतच आटोपला. बांगलादेशने ७४ धावांच्या फरकाने मोठा विजय मिळवला. या विजयासह बांगलादेशने तीन सामन्यांच्या मालिकेत १–० अशी आघाडी घेतली आहे. वेस्ट इंडिजने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला होता. फिरकीला साथ देणाऱ्या खेळपट्टीवर बांगलादेशच्या बॅट्समनलाही धावांसाठी संघर्ष करावा लागला. तौहिद हृदॉयने ५१ धावांची संयमी खेळी केली. महिदुल इस्लाम अकोनने ४६ तर नझमुल हसन शंटोने ३२ धावा करत तौहिदला चांगली साथ दिली. रिषादने १३ चेंडूत १ चौकार आणि २ षटकारांसह २६ धावांची खेळी केली. बांगलादेशचा डाव २०७ धावांत आटोपला.

## आयपीएलचा लिलाव पुन्हा परदेशात होणार?



नवी दिल्ली : आयपीएलचा लिलाव पुन्हा एकदा परदेशात होणार आहे. २०२६ च्या हंगामासाठीचा हा लघु–लिलाव १५ ते १८ डिसेंबर दरम्यान दुबई, मस्कत किंवा दोहा यापैकी एका ठिकाणी होणार आहे. हाती आलेल्या वृत्तानुसार बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने ही माहिती दिली.

भारतात, डिसेंबरच्या मध्यापासून जानेवारीपर्यंत लग्नाचा हंगाम शिगेला पोहोचतो. जवळजवळ प्रत्येक मोठे हॉटेल, रिसॉर्ट किंवा कन्व्हेन्शन सेंटर लग्नासाठी बुक केलेले असतात. १० संघांमधील प्रतिनिधी, प्रशिक्षक, व्यवस्थापक आणि प्रसारण पथकांना सामावून घेणे कठीण आहे. त्यामुळे बोर्डाने यावेळीही परदेशात लिलाव आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान गेल्या आठवड्यात काही माध्यमांनी असा दावा केला होता की यावर्षीचा लिलाव भारतातील एका शहरात होणार आहे.

गेल्या वर्षी, २०२४ मध्ये, आयपीएलचा मेगा लिलाव सौदी अरेबियातील जेद्दाह येथे झाला होता. भारतात स्थळांचा अभाव आणि लॉजिस्टिक आव्हाने ही कारणे म्हणून उद्धृत करण्यात आली होती. यावेळी लिलावासाठी दुबई, मस्कत आणि दोहा ही नावे चर्चेत आहेत. दुबईला सर्वात प्रबळ दावेदार मानले जाते, कारण ते केवळ बीसीसीआय आणि आयपीएल फ्रँचायझींसाठी उत्कृष्ट पायाभूत सुविधा प्रदान करत नाही, तर गेल्या काही वर्षांत तेथे अनेक यशस्वी कार्यक्रमांचे आयोजन देखील केले आहे. दोहा (कतार) हे प्रथमच एक संभाव्य ठिकाण म्हणून चर्चेत आले आहे, जे दर्शवते की बीसीसीआय आता आखाती देशांमध्ये आपली क्रिकेट उपस्थिती आणखी मजबूत करण्याचा विचार करत आहे. बीसीसीआयच्या अधिकाऱ्याने असेही सांगितले की, पुढील वर्षीचा आयपीएल हंगाम २० मार्च रोजी सुरू होऊ शकतो. २०२५ च्या देशांतर्गत हंगामाचे वेळापत्रक लक्षात घेऊन बोर्ड आयपीएल थोडे लवकर सुरू करू इच्छित आहे. जेणेकरून संपूर्ण स्पर्धा मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत पूर्ण करता येईल. यामुळे खेळाडूंना जून–जुलैमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफी किंवा इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल.

## टेस्टपूर्वी शुभमन गिल रोहित शर्माला काय म्हणाला?

दिल्ली–भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात १९ ऑक्टोबर पासून वनडे सीरिजला सुरुवात होणार आहे. दोन्ही संघांमध्ये तीन सामान्यांची वनडे सीरिज खेळवली जाणार असून पर्थ येथे सीरिजमधील पहिला सामना खेळवला जाणार आहे. यासाठी टीम इंडिया १५ऑक्टोबर रोजीच ऑस्ट्रेलियात पोहोचली असून येथे सराव करत आहे. दरम्यान रोहित शर्माकडून वनडे कर्णधारपदाची जबाबदारी काढून ती आता शुभमन गिलकडे सोपवण्यात आली आहे. प्रथमच विराट आणि रोहित सारखे दिग्गज क्रिकेटर हे शुभमन गिलच्या नेतृत्वात खेळतील. वनडे कर्णधार झाल्यावर शुभमनचे रोहित सोबतचे संबंध आता कसे आहेत याबाबतचा खुलासा गिलने वनडे सीरिज सुरु होण्याच्या आधी झालेल्या पत्रकार परिषदेत केले.

काय म्हणाला गिल?

शनिवारी झालेल्या पत्रकार परिषदेत शुभमन गिल म्हणाला की, 'बाहेरची गोष्ट काहीही असो, आमच्यात असं काही नाहीये. ते (रोहित आणि विराट) अगदी आधी सारखेच आहेत. ते खूप मदत करतात आणि नेहमी त्यांचा अनुभव माझ्या सोबत शेअर करतात. मी रोहितकडून सल्ला मागत असतो. मी त्याला (रोहित) विचारले, जर तू कर्णधार असतास तर या विकेटवर काय केले असतेस? मला इतर खेळाडूंकडूनही सल्ला घ्यायला आवडतो. गिल पुढे म्हणाला की, 'माझे विराट आणि रोहित भाई दोघांशीही चांगले संबंध आहेत. मी नेहमीच त्यांचा सल्ला घेतो आणि तेही त्यांचे मत मांडताना अजिबात संकोच करत नाहीत'.लहानपणापासून ते माझे आदर्श :कर्णधार शुभमन गिल म्हणाला की, 'हे असे खेळाडू आहेत ज्यांना मी लहानपणापासून आदर्श मानत आलो आहे. खेळातील अशा दिग्गजांचे नेतृत्व करणे माझ्यासाठी खूप मोठा सन्मान आहे. मला खात्री आहे की या मालिकेत त्याच्याकडून शिकण्याच्या अनेक संधी असतील. जर मी कठीण परिस्थितीत सापडलो तर मी त्यांचा सल्ला घेण्यास मागेपुढे पाहणार नाही'.रोहित आणि विराट खेळाडू म्हणून खेळणार :चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ पर्यंत रोहित शर्मा हाच टीम इंडियाचा वनडे कर्णधार होता. मात्र टेस्ट आणि टी २० क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यावर रोहित शर्माकडून ऑस्ट्रेलिया सीरिजपूर्वी टीम इंडियाचं कर्णधारपद सुद्धा काढून टाकण्यात आलं. ऑस्ट्रेलियाविरुद्ध वनडे सीरिजमध्ये टीम इंडिया शुभमन गिलच्या नेतृत्वात खेळेल. जवळपास ४ वर्षांनी रोहित शर्मा टीम इंडियासाठी खेळाडू म्हणून मैदानात उतरेल. २०२१ माधेविराट कोहलीच्या जागेवर त्याला वनडे कर्णधार बनवण्यात आलं होतं.

## रोहित आणि विराट सोबतचे नाते कसे, शुभमन गिलने सगळे स्पष्ट करुन सांगितले...



**पर्थ–**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका उद्यापासून सुरु होणार आहे. या मालिकेत भारताचे कर्णधारपद शुभमन गिलकडे देण्यात आले आहे. अनुभवी खेळाडू रोहित शर्मा आणि विराट कोहली भारतीय संघाचा भाग असतील.

रोहित शर्मा आणि विराट कोहली चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर पहिल्यांदा भारतीय संघाकडून खेळताना दिसणार आहे. या दोघांसोबत नातं कसं आहे, यावर शुभमन गिलने भाष्य केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर विराट कोहली आणि रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांच्यातील संबंध बिघडल्याचे दावे केले जात होते. रोहित शर्मा आणि विराट कोहली हे दोघे शुभमन गिलसोबत बोलत नाहीत, असा दावा देखील केला जात होता. यावर शुभमन गिलनं प्रतिक्रिया दिली आहे. शुभमन गिल म्हणाला की रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्यासोबत संबंध पहिल्यासारखे मजबूत आहेत, अडचण आल्यास त्या दोघांचा सल्ला घेण्यास मागं पुढे पाहणार नाही, असे म्हटले.

पर्थ वनडे पूर्वी स्वान नदी किनाऱ्यावर आयोजित पत्रकार परिषदेत शुभमन गिल म्हणाला की, ''बाहेर काही चर्चा सुरु असल्या तरी रोहित शर्मा सोबत माझं नातं बदललं नाही. जेव्हा मला मदतीची गरज असेल तेव्हा तो नेहमीच उपलब्ध असतो. पिच संदर्भात काही माहिती घ्यायची असेल किंवा काहीही मी त्याला जाऊन विचारतो, तुम्हाला काय वाटते, जर तुम्ही कर्णधार असता तर काय केले असते. विराट भाई आणि रोहित भाई यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत, ते सल्ला देतात'', असे शुभमन गिल म्हणाला.

शुभमन गिल पुढं म्हणाला की, विराट भाई आणि रोहित भाईसोबत टीमला पुढं घेऊन जाण्यासंदर्भात खूप चर्चा केली आहे. ते कोणत्याही प्रकारे टीमला पुढं घेऊन जाऊ पाहत होते याचा अनुभव आणि धडा यामुळं आम्हाला खूप फायदा होईल. महेंद्रसिंह धोनी, विराट भाई, रोहित शर्मानं जो वारसा निर्माण केला आहे, त्यांचा अनुभव, कौशल्य टीमसाठी खूप महत्त्वाचा आहे, असं गिलनं म्हटलं.

शुभमन गिल म्हणाला की लहान असताना ते माझे आदर्श होते, ते ज्या प्रकारे खेळत होते आणि धावांची भूक होती, त्यातून खूप प्रेरणा मिळते. या टीमचं कर्णधारपद भूषवणं माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. या टीममध्ये महान खेळाडू आहेत, जेव्हा अडचण असेल तेव्हा त्यांचा सल्ला घेण्यात मागं राहणार नाही. मी त्यांच्या कर्णधारपदात खेळताना खूप शिकलो आहे. मला त्याच प्रकारचा कर्णधार व्हायचे आहे. माझ्या सर्व खेळाडूंना सुरक्षित वाटेल, स्पष्ट संवाद होईल, असे गिलने म्हटले. रोहित शर्मा आणि विराट कोहलीने जवळपास २० वर्ष भारतीय क्रिकेटची सेवा केलीय, मी त्यांच्याकडून खूप शिकलोय,त्यांच्या अनुभवाची कोणती तुलना नाही,असेही गिलने म्हटले.

## भारताची धडाकेबाज फलंदाज ; स्मृती मानधना लवकरच इंदूरची सून होणार!



स्मृती मानधना लवकरच 'इंदूरची सून' होणार! प्रियकर पलाश मुच्छलने भर कार्यक्रमात दिली लग्नाची कबुली

मुंबई: भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार सलामीवीर आणि 'नॅशनल क्रश' म्हणून ओळखली जाणारी स्मृती मानधना लवकरच विवाहबंधनात अडकणार आहे. तिच्या आणि प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक–चित्रपट निर्माता पलाश मुच्छल यांच्या प्रेमसंबंधांच्या चर्चांना आता खुद्द पलाशनेच पूर्णविराम दिला आहे.

पलाश मुच्छलने केली घोषणा

पलाश मुच्छल नुकताच इंदूरमध्ये आपल्या आगामी 'राजू बाजे वाला' या चित्रपटाच्या शूटिंगसाठी आला होता. यावेळी इंदूरच्या एका कार्यक्रमात पत्रकारांशी संवाद साधताना त्याला स्मृती मानधनाबद्दल प्रश्न विचारण्यात आला. या प्रश्नावर पलाशने थेट उत्तर न देता, एक सूचक विधान केले, ती (स्मृती मानधना) खूप लवकर इंदूरची सून होईल! मला फक्त एवढंच सांगायचं आहे. त्याच्या या स्पष्ट पण अप्रत्यक्ष घोषणेनंतर उपस्थितांनी टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केला.

**प्रियकर पलाश मुच्छलने भर कार्यक्रमात दिली लग्नाची कबुली**

स्मृती मानधना मूळची महाराष्ट्रातील सांगलीची असून, ती आता इंदूरमध्ये स्थायिक असलेल्या पलाश मुच्छलच्या कुटुंबाची सून होणार आहे. या दोघांच्या नात्याची चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सोशल मीडिया आणि मनोरंजन तसेच क्रीडा जगतात सुरू होती. ते दोघे सुमारे पाच वर्षांपासून एकमेकांना डेट करत आहेत.

पलाश मुच्छल कोण आहे?

पलाश मुच्छल हा एक बॉलिवूडमधील प्रसिद्ध संगीतकार, गायक आणि चित्रपट निर्माता आहे. तो सुप्रसिद्ध गायिका पलक मुच्छल हिचा भाऊ आहे. त्याने 'ढिश्कियाऊं' या चित्रपटातून संगीतकार म्हणून पदार्पण केले. 'भूतनाथ रिटर्न्स'मधील पार्टी तो बनती है सारखे हिट गाणे त्याने संगीतबद्ध केले आहे. कामाच्या बाबतीत, तो सध्या 'राजू बाजे वाला' या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहे. पलाश बॉलिवूडमधील सर्वात तरुण संगीतकारांपैकी एक आहे, त्याने वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली होती.

क्रिकेट–बॉलिवूडचे जुने नाते

भारतीय क्रिकेट आणि बॉलिवूड किंवा संगीत क्षेत्रातील नात्यांची परंपरा जुनी आहे. स्मृती आणि पलाश यांच्यामुळे या नात्याच्या यादीत आणखी एका नवीन 'पॉवर कपल'ची भर पडणार आहे.

पलाशने लग्नाची घोषणा केली असली तरी, त्यांनी अद्याप लग्नाची तारीख अधिकृतपणे जाहीर केलेली नाही. स्मृती मानधना सध्या आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या तयारीमध्ये व्यस्त आहे आणि १९ ऑक्टोबर रोजी इंदूरमध्ये इंग्लंडविरुद्ध सामना खेळणार आहे. त्यामुळे, चाहत्यांना आता हे सुंदर जोडपे कधी आणि कोणत्या तारखेला विवाहबंधनात अडकणार, याची उत्सुकता लागली आहे.

# धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टीमध्ये वाहून गेलेल्या शेतरस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करा :मंत्री गोगावले यांना निवेदन

धाराशिव (प्रतिनिधी)-धाराशिव जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्याचबरोबर शेतरस्ते देखील वाहून गेलेले आहेत. या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी शिव-सेनेचे धाराशिव जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्प-ादन मंत्री भरतशेठ गोगावले यांची प्रत्यक्ष भेट घेवून निवेदनाद्वारे केली आहे.

रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले यांची शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी भेट घेवून धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत सविस्तर चर्चा केली. विशेष म्हणजे नदीकाठच्या गावाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतातील पिकांबरोबर शेतातील मातीही खरवडून वाहून गेली. पशुधनासाठी साठवलेला चाराही वाहून गेला असून अनेक पशुपालकांची जनावरेही पुरात वाहून गेली. तर शेतरस्ते देखील वाहून गेले आहेत. ऐन दिवाळी आणि रब्बी हंगामाच्या तोंडावर अशा गंभीर संकटाला शेतकर्यांना तोंड द्यावे लागत असल्याचे मंत्री महोदयांना अवगत करण्यात आले. शासनाकडून शेतकर्यांना मदत जाहीर करण्यात आलेली असली तरी शेतरस्त्यांच्या दुरुस्तीसाठी देखील निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी केली. त्यावर मंत्री भरतशेठ गोगावले यांनी सदरील वाहून गेले शेत रस्ते नव्याने करण्यासाठी निधी देण्याचा शब्द दिला असल्याची माहिती जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी दिली. यावेळी शिवसेनेचे धाराशिव जिल्ह्यातील इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# धाराशिव जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या जिल्हा पदाधिकाऱ्याची बैठक



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व जिल्हा पदाधिकार्यांची बैठक संपन्न झाली. तसेच मुंबई येथे संसदरत्न खासदार श्रीकांतजी शिंदे साहेब यांची भेट घेऊन होणार्या निवडणुकीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी खासदार श्रीकांत शिंदे साहेबांचा सत्कार धाराशिव जिल्हा शिवसेनेच्या वतीने करण्यात आला.

यावेळी शिवसेना जिल्हा संघटक सुधीर (अण्णा) पाटील, धाराशिव शहप्रमुख आकाश कोकाटे उपस्थित होते.

धाराशिव जिल्ह्यातील नगर परिषद व नगर पंचायतींची निवडणूक स्वबळावर लढवावी की महायुतीकडून याबाबत कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता वाढलेली आहे. दोन महिन्यांवर निवडणुका आल्यामुळे पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मते जाणून घेतली जात आ-हेत. त्यातून पक्षश्रेष्ठींची भूमिका काय असण-ार याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. त्या पार्श्वभूमीवर खासदार श्रीकांतजी शिंदे यांची भेट घेवून या महत्त्वपूर्ण विषयावर चर्चा करण्यात आली.

# शाळांमधील सुविधांसाठी सीएसआर निधीचा गरजेनुसार उपयोग व्हावा -शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे



मुंबई(प्रतिनिधी)- राज्यात एक लाखांहून अधिक शाळांमधून दोन कोटींपेक्षा अधिक विद्यार्थी शालेय शिक्षण घेतात. या विद्यार्थ्यांना राष्ट्र प्रथम या संकल्पनेवर आधारित गुणवत्तापूर्ण आणि आनंददायी शिक्षण दिले जाते. शासनाच्या माध्यमातून शाळांमध्ये विविध सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. याचबरोबर विविध उद्योग सामाजिक उत्तरदायित्व निधीच्या (सीएसआर) माध्यमातून देखील सहकार्य करतात. यामध्ये सुसूत्रता आणून शाळा आणि विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार हा निधी वापरला जावा, असे आवाहन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.

आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून अनेक उद्योग सीएसआर निधीच्या माध्यमातून शाळा आणि विद्यार्थ्यांना सहकार्य करतात. यामध्ये सुसूत्रता येण्याच्या उद्देशाने विविध उद्योगांच्या सीएसआर प्रमुखांशी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत संवाद साधला. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव, उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सहसचिव डॉ. संतोष भोसले, शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांच्यासह विविध उद्योगांचे सीएसआर प्रमुख यावेळी उपस्थित होते.

राज्य शासन विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विविध योजना आणि उपक्रम राबवित आहे. शाळांमध्ये शिक्षकांबरोबरच, पिण्याचे शुद्ध पाणी, स्वच्छ स्वच्छतागृहे, चांगल्या इमारती, प्रयोगशाळा आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. यांसह विद्यार्थ्यांच्या आणि शाळांच्या गरजा लक्षात घेऊन विद्यांजली पोर्टलवर अधिक माहिती उपलब्ध करून दिली जाते. विद्यार्थ्यांना अधिक सोयी सुविधा उप-लब्ध व्हाव्यात यादृष्टीने उद्योगांनी या गरजांचा विचार करून आपले योगदान द्यावे, असे आ-वाहन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.

प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांनी यावेळी उद्योगांच्या सहकार्याने राज्यात सीए-सआरचा निधी उपलब्ध होत असल्याचे सांगितले. 'यूडायस'च्या माध्यमातून आणि केंद्र सरकारच्या 'विद्यांजली' पोर्टलवर राज्यातील सर्व शाळा आणि विद्यार्थ्यांशी संबंधित माहिती उपलब्ध असून शाळांच्या गरजा लक्षात घेऊन हा निधी योग्य ठिकाणी खर्च व्हावा, अशी अपे-क्षा त्यांनी व्यक्त केली. 'विद्यांजली' पोर्टलवर शाळांच्या मागणीची नोंदणी होत असून त्या माहितीचा सीएसआरच्या योग्य नियोजनासाठी उपयोग होईल, असे त्यांनी सांगितले. राज्य शासनाने 'दत्तक शाळा योजना' जाहीर केली असून उद्योगांनी या माध्यमातून शाळा दत्तक घेतल्यास शाळांच्या नावासोबत उद्योगाचे नाव जोडले जाईल, याबाबतही त्यांनी माहिती दिली.

शालेय शिक्षण विभागाच्या वतीने सादरीकरणाद्वारे राज्यातील शालेय शिक्षणाची सद्यस्थिती, सीएसआरमधून सुरू असलेले उपक्रम, कोणत्या उपक्रमांमध्ये सहकार्याची आवश्यकता आहे आदींबाबत माहिती देण्यात आली. त्याचप्रमाणे सीएसआर प्रमुखांनी ते कोणत्या क्षेत्रात काम करू इच्छितात, याबाबत माहिती दिली. सीएसआर प्रमुखांना एका व्यासपीठावर आणून निधीच्या योग्य वापरासाठी विचारांची देवाणघेवाण होत असल्याबद्दल सर्वच सीएसआर प्रमुखांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे आणि शासनाचे आभार मानले.

# बहुभुधारक शेतकऱ्यांनाही मदत मिळावी यासाठी पाठपुरावा गरजेनुसार क्राऊड फंडिंगच्या माध्यमातूनही दिलासा देण्याचा प्रयत्न : आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)-पशुधन दगावले आहे, विहिरी खचल्या आ-हेत, गाळाने भरल्या आ-हेत तर अनेक ठिकाणी अक्षरशः शेतजमीनच महापुरामुळे खरडून गेली आहे. अल्पभूधारक आणि अत्यल्पभूधारक शेतकरी बांधवांना राज्य शासनाच्या अनुदानातून दिलासा मिळणार आहेच. मात्र जिल्ह्या-तील बहुभूधारक शेतकरी बांधवांनाही अशा बिकट परिस्थितीत दिलासा मिळणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे या अभुतपूर्व नुकसानीतून सावरण्यासाठी बहुभूधारक शेतकऱ्यांनाही मदत मिळावी यासाठी आपला पाठपुरावा सुरु आहे. गरजेनुसार क्राऊड फंडिंगच्या माध्यमातून दिलासा देण्याचा आपला प्रयत्न असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

धाराशिव जिल्ह्यातील आठही तालुक्यातील नुकसान भीषण आहे. जिल्ह्यातील ७३३ गावांना अतिवृष्टी आणि महापुराचा तडाखा बसलेला आहे. जिल्ह्यातील ९ जणांचा यात बळी गेला. महाप-ुरात बुडून मयत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबांना आपण तातडीने मदत दिली आहे. ९ पैकी ७ कुटुंबांना प्रत्येकी ४ लाख याप्रमाणे २८ लाख रुपयांच्या मदतीचे आत्तापर्यंत वितरण करण्यात आले आहे. दोन प्रस्ताव प्रलंबित असून त्याची रक्कमही लवकरच संबधित कुटुंबाला देण्यात येईल. संपूर्णपणे खचलेल्या विहिरींची संख्या १३९७ एवढी आहे तर २८६ विहिरींचे अंशतः नुकसान झालेले आहे. जिल्ह्यातील एकूण १६८३ विहिरी खचल्या आ-हेत. यात भूम तालुक्यातील सर्वाधिक ७२३ विहिरींचा समावेश आहे तर त्यापाठोपाठ परंडा तालुक्यातील ५४० विहिरींचे मोठे नुकसान झाले आहे. धाराशिव तालुक्यातील २५, तुळजापूर ३०, उमरगा २८, लोहारा १६, कळंब २२ तर वाशी तालुक्यात १३ विहिरींचे नुकसान झाले आहे. जे अत्यल्प आणि अल्पभूधारक शेतकरी आहेत त्यांच्या विहिरीसाठी सरकारी अनुदान आणि मदत मिळणार आहेच मात्र बहुभूधारक शेतकरी बांधवांनाही दिल-ासा मिळावा यासाठी राज्य सरकारकडे आपला पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

जिल्ह्यातील एकूण ४२७ गावातील तब्बल ८८७९ हेक्टर जमीन महापुरामुळे खरवडून गेली आहे. परंडा तालुक्यातील सर्वाधिक ३९०० हेक्टर तर त्यापाठोपाठ कळंब तालुक्यातील १७६१ आणि भूम तालुक्यात १६७५ हेक्टर जमीन खरवडून गेली आहे. धाराशिव तालुक्यातील १७४ हेक्टर, तुळजापूर तालुक्यात ७४ हेक्टर, उमरगा ३६२ हेक्टर आणि वाशी तालुक्यातील ४९८ हेक्टर जमिनीचा यात समावेश आहे. गाळ साचलेल्या जमिनीचे क्षेत्रही मोठे आहे. जिल्ह्या-तील ९ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रावर गाळ साचलेला आहे. या सगळ्या जमिनी पूर्ववत करण्यासाठी मोठे रचनात्मक काम करावे लागणार आहे. त्यासाठी अत्यल्प आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना सरकारी अन-ुदान आणि मदत मिळणार आहेच. अगदी त्याचप्रमाणे बहुभूधारक शेतकऱ्यांनाही खरवडून गेलेल्या जमिनीच्या दुरुस्तीसाठी मदत मिळावी यासाठी आपला पाठपुरावा सुरू आहे. यंदाच्या पावसाळ्यात एक जूनपासून ते आजवर जिल्ह्यात मयत झालेल्या जनावरांची संख्याही मोठी आहे. दुधाळ मोठी, दुधाळ लहान, ओढकाम करणारी मोठी आणि लहान असे एकूण ५९० इतके पशुधन दगावले आहे. येथेही प्रति जनावर राज्य सरकारने जाहीर केलेली मदत अत्यल्प आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना मिळणार आहे. मात्र या नुकसानीचा फटका बहुभूधारक शेतकरी बांधवांना बसू नये त्यांनाही सरकारी नियमाप्रमाणे आर्थिक दिलासा मिळावा यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. राज्य सरकार अत्यंत संवेदनशीलपणे विचार करीत असून या सर्व शेतकरी बांधवांनाही नक्कीच दिलासा दिला जाईल असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला. याव्यतिरिक्त क्राऊड फंडिंगच्या माध्यमातूनही आपण ज्यांना ज्यांचे नुकसान खूप जास्त आहे त्यांना मदत करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचेही आमदार पाटील यांनी म्हटले आहे.


लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


# कुंभमेळा आयोजनाची कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत - मुख्य सचिव राजेश कुमार




मुंबई, (प्रतिनिधी)- राज्यात नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे २०२७-२८ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित करण्यात येत आहे. मोठ्या संख्येने भाविक पर्यटक येणे अपेक्षित असून त्यादृष्टीने कुंभमेळा प्राधिकरणासह संबंधित विभागांनी आयोजनाची सर्व कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्य सचिव राजेश कुमार यांनी दिले.

मुख्य सचिव राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत कुंभमेळा पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला. यावेळी कुंभमेळ्याशी संबंधित सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

मुख्य सचिव राजेश कुमार म्हणाले, कुंभमेळा आयोजनासाठी प्राधिकरणास सक्षम प्राधिकारी नियुक्त करण्यात आले आहे. यामुळे प्राधिकरणाने प्राधान्याची कामे आणि ती पूर्ण होण्यासाठी लागणारा कालावधी निश्चित करावा. त्यानुसार कामांची प्रशासकीय मान्यता, निविदा आणि कार्यादेश प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. कुंभमेळा यशस्वीरित्या पार पडण्याच्या दृष्टीने दळणवळण, परिवहन, पाणी पुरवठा, मलनि:सारण, घनकचरा व्यवस्थापन, राहण्याची सोय, आरोग्य व्यवस्था, विद्युत व्यवस्था आदी महत्त्वाची कामे सर्व संबंधित विभागांनी वेळेत पूर्ण करावीत. यासाठी विभागांनी आणि प्राधिकरणाने विहित मार्गाने निधीची तरतूद होण्यासाठीची प्रक्रिया तात्काळ करावी.

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियमानुसार प्राधिकरणाने आवश्यकतेनुसार शिखर समिती आणि मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन कुंभमेळा नियोजनाचा आराखडा प्रसिद्ध करावा.

त्यानुसार प्रत्येक विभागाने आपल्या अखत्यारितील कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत. केंद्र सरकारच्या यंत्रणांमार्फत जी कामे सुरू आहेत त्यासाठी प्राधिकरणाने केंद्रीय यंत्रणांसमवेत समन्वय ठेवावा. कुंभमेळा परिसर मोठा असल्याने आणि नाशिकबाहेरील अनेक कर्मचारी कामासाठी येणार असल्याने सर्व यंत्रणांच्या सोयीसाठी लहान लहान झोन तयार करुन त्यास नावे अथवा क्रमांक द्यावेत.

कुंभमेळ्याच्या पूर्वतयारीचा नियमित आढावा आणि देखरेखीसाठी स्वतंत्र संकेतस्थळ तयार करण्यात यावे, असे निर्देशही मुख्य सचिव राजेश कुमार यांनी यावेळी दिले.

यावेळी विविध विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपल्या विभागामार्फत त्याचप्रमाणे नाशिक येथून विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे कुंभमेळ्यासाठी सुरू असलेल्या आणि करण्यात येणाऱ्या कामांची माहिती दिली.

# घरासमोरुन मोटारसायकलची चोरी

तामलवाडी (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी आण्णा शहाजी कदम, वय २६ वर्षे, रा.पिंपळा खुर्द ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचीस्पेलेंडर प्लस मोटरसायकल क्र एमएच २५ ए.आर. २७६४ ही दि. १४.१०.२०२५ रोजी मेव्हण्याच्या घरासमोरुन पिंपळा खुर्द येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-आण्णा कदम यांनी दि.१७.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.


**मध्य रेल्वे**

**सोलापूर विभाग**

**ई-निविदा सूचना**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीन रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवीत आहेत. **निविदा क्रमांक: SUR/L/T/2025/03R कामाचे नाव:** ८ रेल्वे स्थानकांच्या (म्हणजे PPJ, BRB, MLM, BGVN, JNTR, PRWD, WSB, JH) २०२ रेल्वे क्वार्टर आणि २६ सेवा इमारतींच्या विद्युत देखभाल कामांचे आउटसोर्सिंग, तसेच २ LC गेट्स LC ११ (DD-BRB), LC २१ (MLM-BGVN) २ वर्षांच्या (२४ महिन्यांच्या) कालावधीसाठी. **अंदाजे खर्च:** १,३८,१५,७२३.६९ **बोली सुरक्षा:** २,१९,१००.०० **काम पूर्णता कालावधी:** २४ महिने **ऑफरची वैधता:** ९० दिवस **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ:** १३/११/२०२५ रोजी ३.०० वा. बोली सुरक्षा खर्च www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरला जाईल.

वरिष्ठ विभागीय निवड अभियंता (सामान्य)
मध्य रेल्वे, सोलापूर

Apex-81

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and
Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad)    Editor : Jade Dayanand Shankar    Mob:9422472502    RNI- MAHMAR/2003/11649